दैनिक

# महावृत्त

E-Mail:dainikmhavratt@gmail.com

संपादक-अशोक हनवते.मो-9421094991,7264079990



Bharat Chandak

SATYA ELECTRICALS

POLYCAB | Racold | legrand | HAVELLS | INDOASIAN | Finolex | KOLORS | USHA | PHILIPS | GreatWhite | SIEMENS

Tapadia Market, Chain Sukh Road, Latur-413512

Ph :(O) 243678, 244458, 250776, (R) 242018

Email:satyaelectricals@rediffmail.com



लातूर वर्ष ३ रे अंक १३८ वा शुक्रवार दि.२० ऑक्टोंबर २०२३ पृष्ठे ४ स्वागत मूल्य २ रू.


# ईडीला कलम ५० अंतर्गत अटकेचा अधिकार नाही

नवी दिल्ली : दिल्ली उच्च न्यायालयाने गुरुवारी सांगितले की मनी लॉंड्रिंग प्रतिबंधक कायद्याच्या (पीएमएलए) कलम ५० अंतर्गत, एजन्सीला एखाद्या व्यक्तीला समन्स जारी करण्याचा अधिकार आहे, परंतु अटक करण्याचा नाही. न्यायमूर्ती अनुप जयराम भंभानी यांनी १९ ऑक्टोबर रोजी हा आदेश दिला.ते म्हणाले की, पीएमएलएच्या कलम ५० नुसार, एखाद्या व्यक्तीला समन्स जारी करण्याचा, कागदपत्रांची तपासणी करण्याचा आणि स्टेटमेंट रेकॉर्ड करण्याचा अधिकार आहे, जो कोणत्याही दिवाणी न्यायालयाला करण्याचा अधिकार आहे. त्याच वेळी, पीएमएलएच्या कलम १९ अंतर्गत एखाद्या व्यक्तीला अटक करण्याचा अधिकार आहे. न्यायालयाने म्हटले की जर एजन्सीने एखाद्या व्यक्तीला कलम ५० अंतर्गत समन्स जारी केले, परंतु नंतर त्याला अटक केली. अशा परिस्थितीत, ती व्यक्ती न्यायालयाला सांगेल की एजन्सीने त्याला चौकशीसाठी बोलावले होते, परंतु त्याला अटक केली. न्यायालय त्याला सहज निर्दोष ठरवेल. एजन्सीने २०२० मध्ये ईसीआयआर अंतर्गत आशिष मित्तल विरुद्ध गुन्हा दाखल केला होता. एजन्सीने दाखल केलेला गुन्हा संपवण्यासाठी आशिष यांनी न्यायालयात याचिका दाखल केली होती. ईसीआयआर अंतर्गत ईडीने या प्रकरणात कोणतीही कारवाई थांबविण्याची मागणी आशिष यांनी




केली होती. ईडीने याचिकाकर्त्याला २१ ऑगस्ट रोजी चौकशीसाठी बोलावले होते.खटल्याच्या सुनावणीदरम्यान, न्यायालयाने पीएमएलएच्या कलम ५० अंतर्गत एजन्सीला दिलेल्या अधिकारांचा उल्लेख केला. आशिष मित्तल यांनी न्यायालयाला सांगितले की, एजन्सीने त्याच्याविरुद्ध एउकफ अंतर्गत गुन्हा नोंदवला, परंतु त्याची प्रत त्यांना दिली नाही. तर कायद्यानुसार त्यांना प्रत देण्याचा अधिकार आहे.पीएमएलएबाबत कोर्टातही सुनावणी पीएमएलएबाबत दाखल करण्यात आलेल्या पुनर्विचार याचिकेवरही सर्वोच्च न्यायालयात सुनावणी सुरू आहे. वास्तविक, मनी लॉंडरिंग कायद्यातील अनेक तरतुदींना घटनाबा ठरवून सर्वोच्च न्यायालयात आव्हान देण्यात आले होते. जुलै २०२२ मध्ये या प्रकरणाची सुनावणी करताना न्यायालयाने हा कायदा कायम ठेवला. यानंतर याचिकाकर्त्यांनी पुनर्विचार याचिका दाखल करून या प्रकरणाचा फेरविचार करण्याची विनंती न्यायालयाला केली. दोन नियम विचारात घ्या पुनर्विलोकन याचिकेवर सुनावणी करताना न्यायालयाने हे मान्य केले की पीएमएलएचे दोन नियम विचारात घेण्याची गरज आहे, ईडीने नोंदवलेल्या एफआयआरचा अहवाल आरोपीला न देण्याची तरतूद आणि त्याचे निर्दोषत्व सिद्ध करण्याची जबाबदारी त्याच्यावर अवलंबून आहे. आरोपी. या प्रकरणाची पुढील सुनावणी २२ नोव्हेंबरला होणार आहे.

# तेरणातून सिंचनासाठी उपसा करण्यास परवानगी देण्याची आ. अभिमन्यू पवारांची मागणी..

## प्रस्ताव तयार करून मंजुरीसाठी सादर करण्याच्या उपमुख्यमंत्र्यांच्या प्रशासनाला सूचना....

औसा – यावर्षी पाऊस समाधानकारक झाला नसल्याने निम्न तेरणा प्रकल्पात अत्यल्प पाणीसाठा शिल्लक आहे. यामुळे जिल्हा प्रशासनाने पिण्याच्या पाण्याचा विचार करुन सिंचनास पाणी उपसा बंद केला आहे. त्यामुळे यासंदर्भात योग्य तो मार्ग निघावा यासाठी आमदार अभिमन्यू पवार यांच्या मागणीवरून धाराशिव जिल्हाधिकारी कार्यालयात बैठक आयोजित करण्यात आली होती. यावेळी मृत पाणीसाठ्याच्या वापरासंदर्भातील अंतिम निर्णयाचे अधिकार जिल्हा प्रशासनाकडे नसल्याने बैठकीतून आमदार अभिमन्यू पवार यांनी उपमुख्यमंत्री तथा जलसंपदा मंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याशी संपर्क साधून त्यांना नोव्हेंबरअखेरपर्यंत सिंचनासाठी उपसा करण्यास परवानगी देण्याची विनंती केली. यासंदर्भात मुख्यमंत्र्यांनी तात्काळ प्रस्ताव तयार करून मंजुरीसाठी सादर करण्याच्या सूचना त्यांनी प्रशासनाला दिल्या आहेत. त्यामुळे निम्न तेरणातून सिंचनासाठी पाणी उपसा करण्याचा मार्ग मोकळा होणार आहे.

निम्न तेरणा प्रकल्पात अत्यल्प पाणीसाठा शिल्लक आहे. आगामी पावसाळ्यापर्यंत पिण्यासाठी लागणार्या पाण्याचा विचार करुन जिल्हा प्रशासनाने प्रकल्पातील सिंचनासाठीचा पाणी उपसा बंद केला आहे. एकीकडे अपेक्षित पाऊस न झाल्याने पाण्याचा वापर काटकसरीने करणं गरजेचं आहे आणि दुसरीकडे शेतकऱ्यांचे नुकसान होणार नाही याची काळजीही घेणं गरजेचं आहे. त्यामुळे यासंदर्भात सविस्तर चर्चा करुन धोरण ठरविण्यासाठी आढावा बैठक बोलाविण्यात यावी अशी मागणी आमदार अभिमन्यू पवार यांनी प्रशासनाकडे केली होती,यावरून (दि.१९) ऑक्टोबर रोजी धाराशिव जिल्हाधिकारी कार्यालयात बैठक आयोजित करण्यात आली होती. उपयुक्त पाणीसाठा पाणीपुरवठा योजनांसाठी वापरायचा आणि उर्वरित साठ्यातून नोव्हेंबर अखेरपर्यंत सिंचनासाठी पाणी उपसा करण्यास शेतकऱ्यांना परवानगी द्यायची असा सुवर्णमध्य साधण्याचा निर्णय या बैठकीत



झाला. मृत पाणीसाठ्याच्या वापरासंदर्भातील अंतिम निर्णयाचे अधिकार जिल्हा प्रशासनाकडे नसल्याने बैठकीतून आमदार अभिमन्यू पवार यांनी उपमुख्यमंत्री तथा जलसंपदा मंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याशी संपर्क साधून त्यांना नोव्हेंबरअखेरपर्यंत सिंचनासाठी उपसा करण्यास परवानगी देण्याची आग्रही विनंती केली. यासंदर्भात तात्काळ प्रस्ताव तयार करून मंजुरीसाठी सादर करण्याच्या सूचना त्यांनी प्रशासनाला दिल्या आहेत. याबाबत प्रस्ताव आजच तयार करुन मंजुरीसाठी सादर केला जाईल व उद्या मुंबई दौऱ्यादरम्यान या विषयाचा पाठपुरावा करण्याचे नियोजन असल्याचे आमदार अभिमन्यू पवार यांनी सांगितले.

या बैठकीला खासदार ओम राजेनिंबाळकर, आमदार कैलास पाटील, धाराशिवचे जिल्हाधिकारी सचिन ओंबासे, लातूरच्या जिल्हाधिकारी वर्षा घुगे – ठाकूर, अधीक्षक अभियंता चिस्ती, कार्यकारी अभियंता अमर पाटील, भाजप जिल्हाध्यक्ष संताजी चालुक्य, माजी नगराध्यक्ष मकरंद राजेनिंबाळकर, संबंधित सर्व विभागांचे प्रमुख अधिकारी, कर्मचारी आणि लातूर व धाराशिव जिल्ह्यातील शेकडो शेतकरी बांधव उपस्थित होते.

# प्रदूषणाच्या बाबतीत मुंबईने दिल्लीचा विक्रम मोडला

मुंबई : हिवाळा येण्यास अजून वेळ असला तरी मुंबईत प्रदूषणच्या पातळीत वाढ होताना दिसत आहे. विशेष म्हणजे, प्रदूषणाच्या बाबतीत नेहमी दिल्लीची चर्चा होत असते पण यावेळी प्रदूषणाच्या बाबतीत मुंबईने दिल्लीचा विक्रम मोडला आहे. गेल्या तीन दिवसांपासून मुंबईची हवा दिल्लीपेक्षा विषारी बनली आहे. वाढत्या प्रदूषणाला राज्य सरकारच्या मंत्र्यांनी सध्या सुरू असलेले प्रकल्पांना जबाबदार धरले आहे. तसेच मुंबईत पारा ३६ अंशांच्या पुढे गेला आहे. तसेच बुधवारी धुक्यामुळे मुंबई उपनगरीय नेटवर्कच्या मुख्य मार्गावरील लोकल ट्रेन १५ ते २० मिनिटे उशिराने धावत होत्या. तज्ज्ञांचे असे मत आहे की, सर्वत्र सुरू असलेले बांधकाम आणि ३४ ते ३६ अंशांच्या कडक उष्णतेमुळे आर्थिक राजधानी मुंबईत गेल्या तीन दिवसांपासून हवेची गुणवत्ता म्हणजेच एक्यूआय पातळी मध्यम ते खराब श्रेणीत दिसून येत आहे. या कालावधीत, मुंबई आणि आजूबाजूच्या भागात सर्वात जास्त प्रभावित भाग अंधेरी, माझगाव, नवी मुंबई हे आहेत. जेथे एक्यूआय ३०० च्या पुढे राहिला आहे. सिस्टीम ऑफ एअर क्वालिटी अँड वेदर फोरकास्टिंग अँड रिसर्च (एसएएफएआर–इंडिया) नुसार, गुरुवारी सकाळी मुंबईतील एक्यूआय पातळी १६६ नोंदवण्यात आली, तर दिल्लीत ती ११७ होती. बुधवारी संध्याकाळी ६ वाजता मुंबईच्या हवेतील पीएम पातळी १० होती तर एक्यूआय १४३ होता. तर दिल्लीत एक्यूआय १२२ होता.

# ज्ञानप्रकाश विद्यार्थ्यांचे क्रीडास्पर्धेत यश

लातूर/प्रतिनिधी लातूर जिल्ह क्रीडासंकुल येथे दि. १४ व १५ रोजी शालेय विभागीय बुध्दीबळ व योगासन स्पर्धा पार पडल्या या स्पर्धेत ज्ञानप्रकाश बालविकास केंद्राच्या विद्यार्थ्यांनी उत्कृष्ट कामगिरी करुन राज्यस्तरावर खेळण्याची संधी मिळवली आहे. विभागीय बुध्दबळ स्पर्धेत सार्थक चव्हाण याने १७ वर्षाखालील




गटात प्रथम क्रमांक मिळवला आहे. सार्थक आता पुढे सिंधुदुर्ग येथे राज्यस्तरावर होणार्या स्पर्धेत खेळणार आहे. योगासन या प्रकारातही ज्ञानप्रकाशने यश मिळवले आहे. या प्रकारातही ज्ञानप्रकाशचे विद्यार्थी राज्यस्तरावर खेळणार आहेत. १७ वर्ष गटात मुलीमध्ये आर्टीस्टिक योगा प्रकारात सृष्टी मुळे (प्रथम), १७ वर्षाखालील मुलांमध्ये योगा प्रकारात अथर्व झुंजे (दुसरा), सार्थक जांभळे (तिसरा), १७ वर्ष मुलींमध्ये आदिती सुर्यवंशी (तिसरा) व सृष्टी मुळे (पाचवा) तर १४ वर्ष गटात – योगासन वैदेही पाटील (पाचवा) सर्व विद्यार्थ्यांचे ज्ञानप्रकाशचे प्रकल्प प्रमुख सतीश नरहरे, मुख्याध्यापिका सविता नरहरे, पर्यवेक्षक अशोक गुरदाळे, आणि क्रिडा प्रशिक्षक प्रकाश टिमके, विभाग प्रमुख प्रशांत शिंदे तसेच शिक्षकांनी अभिनंदन करुन पुढील स्पर्धांसाठी शुभेच्छा दिल्या.

# सहकारी संस्थांच्या लेखापरिक्षणांसाठी सन २०२३-२०२६ या कालावधीकरिता लेखा परिक्षक नामतालिकेसाठी अर्ज करण्याचे आवाहन

लातूर, दि. १९ (जिमाका) : सद्यस्थितीत सहकार खात्याच्या लेखापरीक्षक नामिकेवर असलेल्या लेखा परीक्षकांनी तसेच नामिकेवर नव्याने देवू इच्छिणाऱ्या लेखापरीक्षकांनी उक्त निर्धारित मुदतीत उपरोल्लेखीत वेबसाईटवर ऑनलाईन अर्ज सादर करावे असे आवाहन जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, लातूर यांनी केले आहे.महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० ये कलम ८१ अन्वये सहकारी संस्थांचे लेखापरीक्षण, निबंधकांनी तयार केलेल्या व राज्य शासनाने मान्यता दिलेल्या नामतालिकेवरील लेखापरीक्षकांकडून करवून घेण्याची तरतूद आहे.सहकारी संस्थांच्या लेखापरीक्षकांच्या नामिकेसंदर्भात महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ८१ व आणि महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६१ चे नियम ६९ (१) (फ) मधील तरतूदीनुसार सहकारी संस्थाच्या लेखापरीक्षणासाठी सन २०२३ २०२६ या कालावधीसाठी लेखापरीक्षक नामिका तयार करण्यासाठी ़.ारहरीरहरज्ञारी.ारहरीरीहीीर.र्सीं.ळप या वेबसाईटवर दिनांक २३ ऑक्टोबर २०२३ ते ०६ नोव्हेंबर या कालावधीत ऑनलाईन अर्ज मागविण्यात येत आहेत. ऑनलाईन अर्जासंदर्भात सविस्तर तपशील वेबसाईटवर सर्व जिल्हा उपनिबंधक, सर्व जिल्हा विशेष लेखापरीक्षक आणि सर्व कार्यालयामध्ये उपलब्ध आहे.

# राज्यस्तरीय शालेय वेटलिफ्टिंग स्पर्धे साठी प्रगती कांबळे या विद्यार्थीनीची निवड

लातूर दि.१९–१०–२०२३ जेएसपीएम लातूरद्वारा संचलित श्री स्वामी विवेकानंद ज्युनियर कॉलेज लातूरच्या १९ वर्ष वयोगटातील २ विद्यार्थीनीने यश संपादन केलेले आहे. यामध्ये १९ वर्ष वयोगटातील मुलींमध्ये ६४ किलो वजन गटामध्ये प्रगती कांबळे ही विद्यार्थीनी प्रथम आलेली आहे तर शुभांगी घाडगे या विद्यार्थीनीने ७४ किलो वजन गटामध्ये वेटलिफ्टिंगमध्ये द्वितीय क्रमांक पटकाविलेला आहे. यामध्ये प्रगती कांबळे या विद्यार्थीनीची राज्यस्तरीय वेटलिफ्टिंग स्पर्धेसाठी निवड झालेली आहे.



यासाठी क्रीडा शिक्षक बाळासाहेब शेप व विनायक टेकाळे यांचे मार्गदर्शन लाभले आहे. त्यांच्या यशाबद्दल जेएसपीएम संस्थेचे संस्थापक अध्यक्ष माजी आ.शिवाजीराव पाटील कव्हेकर, संस्थेच्या सचिव सौ.प्रतिभाताई शिवाजीराव पाटील कव्हेकर, संस्थेचे उपाध्यक्ष अजितसिंह पाटील कव्हेकर, कार्यकारी संचालक रंजितसिंह पाटील कव्हेकर, समन्वयक संचालक निळकंठराव पवार, शैक्षणिक समन्वयक संभाजीराव पाटील, समन्वयक बापूसाहेब गोरे, समन्वयक विनोद जाधव, प्राचार्य मारूती सूर्यवंशी, उपप्राचार्य मनोज गायकवाड, उपप्राचार्य विठ्ठल चेवले, उपप्राचार्य प्रभाकर अंकुश, प्रा.हणुमंत बद्दे यांच्यासह शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचार्यांनी त्यांचे अभिनंदन केले.

# आज सामाजिक न्याय व विशेष साहाय्य विभागाच्या वतीने ३३मिनी ट्रॅक्टरसाठी ३३ बचत गटांची निवड होणार!

## सहाय्यक आयुक्त एस एन चिकुर्ते यांचे अनुसूचित जाती व नवबौद्ध समाजाकडून कौतुक

लातूर :– आज सामाजिक न्याय व विशेष साहाय्य विभागाच्या वतीने ३३मिनी ट्रॅक्टरसाठी ३३ बचत गटांची निवड होणार! सामाजिक न्याय व विशेष साहाय्य विभागाच्या वतीने अनुसूचित जाती व नवबौद्ध घटकातील नोंदणीकृत स्वयंसहायता बचत गटांना मिनी ट्रॅक्टर तसेच त्याची उपसाधने ९० टक्के अनुदानावर वाटप केली जातात. त्यासाठी आज २० ऑक्टोबर रोजी सोडत काढली जाणार आहे. या आर्थिक वर्षामध्ये ३३ बचत गटांना ट्रॅक्टर देण्याचे उद्दिष्ट आहे. त्यासाठी जिल्ह्यातून ९० च्या वर अर्ज आले आहेत. निवड झाल्यानंतर बचत गटांना तीन लाख पंधरा हजार रुपये दोन टप्यात दिले जाणार आहेत. अनुसूचित जाती व नवबौद्ध घटकातील स्वयंसहायता बचत गटांना मिनी ट्रॅक्टर देण्याची ही योजना सामाजिक न्याय व विशेष साहाय्य विभागाच्या वतीने राबविले जाते. अनुसूचित जाती व नवबौद्ध घटकातील नोंदणीकृत स्वयंसहायता बचत गटांना मिनी ट्रॅक्टर व त्याची उपसाधने देण्यासाठी ही योजना सामाजिक न्याय विभागाकडून राबवली जाते, निवड झालेल्या बचत गटाला तीन लाख पंधरा हजार रुपये दोन टप्प्यात दिले जातात. ९० अर्ज, ३३ बचत गटांची निवड....

२० ऑक्टोबर रोजी डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन लातूर येथे मिनी ट्रॅक्टरसाठी सोडत काढली जाणार आहे. लातूर जिल्ह्याला ३३ ट्रॅक्टर देण्याचे उद्दिष्ट आहे. त्यासाठी ९० अर्ज आले असून ६८ अर्ज पात्र आहेत. पैकी ३३ अर्जाची निवड केली जाणार आहे. मिनी ट्रॅक्टरसाठी ९० टक्के अनुदान

अनुसूचित जाती व नवबौद्ध घटकातील नोंदणीकृत स्वयंस– हायता बचत गटांना पूर्वी तीन लाख रुपये ९० टक्के अनुदानावर दिले जात होते. नव्या पद्धतीनुसार तीन लाख पंधरा हजार रुपये दोन टप्यात दिले जात आहेत.

बचत गटाने ट्रॅक्टर खरेदीनंतर ५० टक्के आणि आरटीओकडे नोंदणी झाल्यानंतर पन्नास टक्के अनुदान आहे. या योजनेसाठी बचत गटातील ८० टक्के सदस्य अनुसूचित जाती व नवबौद्ध घटकातील असणे बंधनकारक आहे. बचत गटाचे अध्यक्ष आणि सचिव हे अनुसूचित जातीतील असावे ही प्रमुख अट या योजनेसाठी आहे. ३ लाख १५ हजारांचे अनुदान मिनी ट्रॅक्टरसाठी दिले जाते. त्यापेक्षा अधिक रक्कम लागत असेल तर ती बचत गटांनी भरावी. दोन टप्प्यांमध्ये अनुदान वितरीत केले जाते.

# डाबर कंपनीच्या उत्पादनावरून अमेरिका आणि कॅनडात गोंधळ

मुंबई : डाबरच्या ३ उपकंपन्यांविरुद्ध अमेरिका आणि कॅनडामध्ये खटले सुरू आहेत. कंपनीने माहिती दिली की या देशांतील ग्राहकांनी आरोप केला आहे की डाबरच्या उत्पादनांमध्ये अशी रसायने मिसळली जात आहेत. ज्यामुळे गर्भाशयाचा कर्करोग होतो.कंपनीचे म्हणणे आहे की, बिनबुडाच्या आणि अपूर्ण अभ्यासाच्या आधारे कंपनीवर आरोप करण्यात आले आहेत. कंपनीने सांगितले की, कंपन्यांविरुद्ध ५,४०० गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. यामध्ये डाबरच्या तीन सहयोगी कंपन्या नमस्ते लॅबोरेटरीज, डर्मो विवा स्किन एसेंशियल आणि डाबर इंटरनॅशनल यांचा समावेश आहे. कंपनीचे म्हणणे आहे की त्यांच्या युनिट्सने काहीही चुकीचे केले नाही आणि न्यायालयात स्वत:चा बचाव करण्यासाठी वकील नियुक्त केले आहेत. या बातमीमुळे बुधवारी कंपनीच्या शेअर्समध्ये एक टक्का घसरण झाली. आज म्हणजेच १९ ऑक्टोबर रोजी कंपनीचे शेअर्स १.४० टक्क्यांच्या घसरणीसह ५२६.५५ रुपयांच्या पातळीवर व्यवहार करत आहेत.तेल आणि साबण यांसारख्या दैनंदिन वापराच्या वस्तू बनविणा–या डाबरला ३२०.६० कोटी रुपयांचा वस्तू आणि सेवा कर (जीएसटी) भरण्याची नोटीस मिळाली आहे. डाबर इंडियाने स्टॉक एक्स्चेंजला ही माहिती दिली आहे. कंपनीने सांगितले की, डाबरला केंद्रीय जीएसटी कायदा, २०१७ च्या कलम ७४(५) अंतर्गत कर दायित्वाबाबत माहिती मिळाली आहे. यामध्ये व्याज आणि दंडासह ३२०.६० कोटी रुपये जीएसटी म्हणून भरण्याची सूचना देण्यात आली आहे.

## संपादकीय....

# भारतासाठी अणुऊर्जा हवीच, पण कशी?

ज्येष्ठ अणुशास्त्रज्ञ डॉ. अनिल काकोडकर यांचा हा लेख कोणत्याही बड्या किंवा परदेशी कंपनीचे समर्थन करत नाही, तरीही स्वावलंबी अणुऊर्जेचा आग्रह धरतो डॉ. अनिल काकोडकर भारताची अर्थव्यवस्था झपाट्याने वाढत आहे. हे दशक संपण्यापूर्वी आपण जर्मनी आणि जपानला मागे टाकून पाचव्या क्रमांकावरून तिसऱ्या क्रमांकावर जाऊ, अशी अपेक्षा आहे. आर्थिक वाढीमुळे ऊर्जेची मागणी वाढते. आपला खंडप्राय देश ऊर्जा–वापराबाबत आधीच जगात तिसऱ्या स्थानावर असताना, आपल्या अर्थव्यवस्थेचा आकार वाढत असताना प्राथमिक ऊर्जेच्या वापरातही लक्षणीय वाढ अपेक्षित आहे. मात्र आजवर आपण बऱ्याच अंशी जीवाश्म ऊर्जे वरच भिस्त ठेवतो आणि आपल्याही नकळत, जागतिक तापमानवाढीस (ग्लोबल वॉर्मिंग) हातभार लावतो. जागतिक तापमानवाढ हे मानवजातीवरील संकट समजले जाते आणि जीवाश्म इंधनाचा वापर हा त्यात योगदान देणारा प्रमुख घटक आहे. तापमानवाढीस कारणीभूत होणाऱ्या हरितगृह वायूंच्या उत्सर्जनात कपात करून ते 'निव्वळ शून्यावर' (नेट झीरो) आणणे, ही आता अटळ गरज बनली आहे. सन २०४५ ते २०७० या कालावधीपूर्वी हे लक्ष्य गाठण्यावर सध्या जागतिक एकमत झालेले आहे. 'निव्वळ शून्या'कडे संक्रमणामध्ये ऊर्जा प्रणालींचे मोठ्या प्रमाणात परिवर्तन, नवीन तंत्रज्ञानाचा समावेश, पुरवठा आणि मागणीनुसार ऊर्जा प्रणालींची पुनर्रचना आणि या सर्वांसाठी मोठ्या खर्चाचा समावेश होतो. भारतासारख्या मोठ्या आणि विकसनशील देशासाठी 'निव्वळ शून्या'वर पोहोचण्याचे आव्हान अधिकच मोठे ठरते, कारण आपल्या विकासाच्या आकांक्षांसाठी दरडोई ऊर्जा वापरात अनेक पटींनी वाढ होणे आवश्यकच आहे. या दुहेरी आव्हानाला सामोरे जाण्यात आपण असमर्थ असताच कामा नये – नाही तर, विकासाशी तडजोड करणे किंवा निव्वळ–शून्य लक्ष्य कालावधी पूर्ण करण्यात अयशस्वी होणे यापैकी एक तरी, किंवा हे दोन्ही परिणाम आपल्याला भोगावे लागतील. जगातील प्रगत देशांच्या तुलनेत मानव विकास निर्देशांक गाठण्याचीही भारतीयांची इच्छा आहे. यासाठी आजच्या हिशेबाने आपल्या दरवर्षी किमान २,४०० किलोग्रॅम तेल समतुल्य (ज्ञसेश) ऊर्जा वापर आवश्यक आहे. ऊर्जा वापर कार्यक्षमतेत अपेक्षित सुधारणा झाल्यामुळे ही पातळी सुमारे १,४०० ज्ञसेश पर्यंत सुधारू शकते. याचा विचार करूनही, तोवर भारतासाठी एकूण स्वच्छ ऊर्जेची गरज सुमारे २५,००० ते ३०,००० टेरावॅट तास/वर्ष (ढ्थही/ी : एक टेरावॅट म्हणजे सुमारे ११४ मेगावॅट ) इतकी वाढलेली असेल. हे आपल्या सध्याच्या ऊर्जा वापराच्या चौपट आहे. जलविद्युतसह नवीकरणीय ऊर्जेच्या उपयोजनामध्ये आपण जलद गतीने प्रगती करत असताना, केवळ हीच वीजनिर्मिती साधने आपल्याला प्रगत देश बनण्यास सक्षम करतीय का? याचे सरळ आणि शास्त्रीय उत्तर 'नाही' असेच आहे.समजा, भारतातील संपूर्ण बिगरशेती (पडीक/ना–पीक) जमीन सौरऊर्जा संच उभारण्यासाठी वापरली गेली (जे खरे तर, शक्य नाही), तरीही आपल्याला हवी तेवढी वीजनिर्मिती होऊ शकत नाही, ती लक्ष्यापेक्षा कमी पडेल. पवन ऊर्जेची क्षमता तर आणखी कमी असते. त्यामुळेच यातून बाहेर पडण्याचा एकमेव मार्ग म्हणजे अणुऊर्जेची वेगवान वाढ. त्यासाठी अणुऊर्जेबद्दलची निराधार भीती दूर करायला हवी. आजघडीला अणुऊर्जा हा सर्वात स्वच्छ आणि सुरक्षित ऊर्जास्रोत म्हणून उदयास आला आहे आणि हा स्रोत हवामान बदलाचा प्रभावीपणे सामना करण्यास सक्षम आहे. आपला देश 'बंद आण्विक इंधन चक्रा'ची कास धरत असल्याने, अणुऊर्जा प्रकल्पांतील (किरणोत्सारी) कचऱ्याची समस्यादेखील कमी होऊन नगण्य पातळीवर आली आहे. या संदर्भात आयआयटी–मुंबईकडून योग्य विश्लेषणात्मक निरीक्षणांच्या आधाराने नवी दिल्लीतील 'विवेकानंद इंटरनॅशनल फाऊंडेशन'ने केलेल्या अभ्यासातून असे दिसून येते की, विकसित होऊनही निव्वळ–शून्य गाठायचे असेल तर अणुऊर्जा निर्मतीचा वेग दोन हजार गिगावॅटच्या निर्मितीक्षमतेपर्यंत (दोन हजार ऋथ्श पर्यंत) वाढवणे आवश्यक आहे. अंमलबजावणीसाठी हे एक मोठे आव्हान आहे आणि ते पूर्ण करण्यासाठी देशाने तयारी केली पाहिजे. सुदैवाने, तंत्रज्ञानाच्या आघाडीवर आपण स्वावलंबी आहोत, सक्षम आहोत. मात्र यासाठी आवश्यक धोरण आणि राजकीय तसेच लोक–पाठिंब्याचा निर्धार आता आवश्यक आहे. अणुऊर्जेने योग्य भूमिका बजावल्याशिवाय देश विकसित राष्ट्राचा दर्जा गाठू शकणार नाही. आपल्याला याकामी आपल्या स्वतःच्या रणनीतीचेच मार्गदर्शन पुरेसे आहे कुणा परदेशी विक्रेत्यांकडून त्याची गरज नाही. या संदर्भात, अणुऊर्जेच्या जलद वाढीसाठी पुढील मुद्दे लक्षात घेऊन राष्ट्रीय धोरणाचा पाठपुरावा करणे फायदेशीर ठरेल.स्वदेशी ७०० मेगावॅट वीजनिर्मिती क्षमतेच्या भट्ट्या किंवा अण–वीज– क्रियाधानी (प्रेशराइज्ड हेवी वॉटर रिक्टर झक्थ्ठ) यासाठी प्रामुख्याने वापरल्या जाव्यात. अशा क्रियाधानीचे पहिले युनिट आधीपासूनच व्यावसायिकरीत्या कार्यरत आहे अशा आणखी १५ भट्ट्यांची उभारणी सुरू आहे (म्हणजे अणुभट्टी– बांधणीच्या परिभाषेत 'फ्लीट मोड' – हा कालावधी पाच वर्षांचा असू शकतो). 'न्यूक्लिअर पॉवर कॉर्पोरेशन ऑफ इंडिया' व्यतिरिक्त अनेक सार्वजनिक उद्योगांची (भारत सरकारच्या उपक्रमांची) मदत घेऊन अशी अनेक 'फ्लीट मोड' कामे हाती घेणे आवश्यक आहे. दुसरे म्हणजे, येत्या काही दशकांत कोळसा संयंत्रे निवृत्त होणार असल्याने त्या मोठ्या संख्येने रिकाम्या होणाऱ्या स्थळांवर स्वदेशी 'लघु परिवर्तनीय क्रियाधानी' (ड्चठ) तयार करणे आवश्यक आहे. केवळ मोठ्या अणुवीज भट्ट्यांची (झथठ) आयात करण्यावर भिस्त ठेवल्यास वीज उत्पादन परवडणारे ठरणार नाही.

# खरीप गेला, रब्बी हंगाम तरी मिळेल का?

महाराष्ट्रातील 'डबल इंजिन' सरकारला कृषी क्षेत्रातली धोक्याची घंटा नीटशी ऐकू आलेली नाही यंदा पावसाळ्याच्या एकूण १७ आठवड्यांपैकी १० आठवडे सरासरीपेक्षा कमी पाऊस झाला. तर सात आठवड्यांत सरासरीपेक्षा जास्त पाऊस झाला. कमी कालावधीत जास्तीत जास्त पावसाची नोंद हे यावर्षीच्या मान्सूनचं वैशिष्ट्य. यंदा ५७.६ टक्के तूट देशभरात नोंदवली गेली. १० ऑक्टोबर २०२३ हा वेधशाळेने जाहीर केलेला मान्सूनपरतीचा दिवस. यंदा १३ जिल्ह्यांत सरासरीपेक्षा अधिक तर २३ जिल्ह्यांत सरासरीपेक्षा कमी पाऊस नोंदवला गेला.परतीचा पाऊस थोडा दिलासा देईल याकडे राज्यातील शेतकरी आस लावून बसला आहे. कमी पर्जन्यमानामुळे अनेक जिल्ह्यांत आगामी काळातल्या पिकांची लावणी कशी होणार, ही चिंता आहे. तर, येत्या काळात प्रशासनाला पिण्याच्या पाण्याची सुविधा अनेक ठिकाणी पुरवावी लागणार आहे. राज्य सरकारकडे विविध शेतकरी संघटना आणि विरोधी पक्षाच्या लोकप्रतिनिधींनी कोरडा दुष्काळ जाहीर करण्याची मागणी लावून धरली, मात्र या मागणीला जोर नव्हता. शिवाय सरकारने दुष्काळ निवारणासाठी प्रत्यक्ष उपाययोजना करण्याऐवजी मंत्रालयाच्या सातव्या मजल्यावर 'वॉर रूम' तयार केली. 'वॉर रूम' या एकमेव उपायजनेवर राज्यातील मान्सूनकाळ संपला आहे. कोकण आणि उर्वरित महाराष्ट्रात जुलैत पाऊस पडला. ऑगस्ट, सप्टेंबर कोरडेठाक गेले. सप्टेंबरमध्ये विदर्भात पूरस्थिती होती. या वर्षी राज्यातील ११ जिल्ह्यांमध्ये जून ते ऑगस्ट महिन्यात सरासरीच्या ३२–४४ टक्के कमी पाऊस झाल्याची नोंद आहे. ऑगस्ट महिन्यात महाराष्ट्रात सरासरीच्या केवळ ४० टक्के पावसाची नोंद झाली. कोरड्या सप्टेंबरातल्या शेवटच्या चार दिवसांत वादळी हवामानाने काही ठिकाणी तुरळक तर काही ठिकाणी मुबलक पाऊस झाला. गेल्या शंभर वर्षांमध्ये पहिल्यांदाच ऑगस्ट महिन्यात कमी पावसाची नोंद झाली. मराठवाड्यातील सर्व जिल्ह्यांमध्ये पावसाअभावी पिकं संकटात आली होती. अशा पिकांना जीवदान मिळालं तरी उत्पन्नातील तूट भरून निघणार नाही. शिवाय या पावसाळ्यात झालेली जमिनीखालच्या पाण्याची घट परतीच्या किंवा अवकाळी पावसाने भरून निघणार नाही. राज्यातल्या धरणांमधला पाणीसाठादेखील गतवर्षीच्या तुलनेत कमी आहे. त्याच्या सप्टेंबरअखेरच्या काही नोंदी अशा – अहमदनगर जिल्ह्यात सरासरी ८४.३० %, जळगाव आणि नाशिक जिल्ह्यात सरासरी ९१.१५ %, मुंबईत ९९.४० %, ठाणे आणि उर्वरीत कोकण विभाग ९५ %, पुणे विभागात ९१.२८ %, सातारा– कोल्हापूर जिल्ह्यांत ७२.५० %, मराठवाडा विभागात ५४.११ % आणि विदर्भात ७०.५० %.एल निनोच्या मान्सूनवरील प्रभावामुळे मान्सूनच्या सुरुवातीच्या पर्जन्यमानात तूट झाली. त्यामुळे राज्यातील खरीप हंगामातील पेरणीचं क्षेत्र २.७२ लाख हेक्टरनं घटलं. ऑगस्ट– सप्टेंबरात पावसाने दिलेल्या ओढीमुळे मराठवाड्यातील सुमारे ३५ लाख हेक्टर तर पश्चिम महाराष्ट्रातील सुमारे २२ लाख हेक्टरवरील पिकांच्या वाढीवर आणि उत्पादनावर परिणाम झाला आहे. राज्यातील २२ जिल्ह्यांतील भूजल पातळी घटल्याने विहिरी, तलाव, बोअरवेल यांनी तळ गाठला. मराठवाड्यातलं वास्तव भयावह आहे. तिथे जून आणि ऑगस्टमध्ये फक्त सात दिवस, जुलैत २२ दिवस, सप्टेंबरात तर फक्त तीन दिवस पाऊस झाला. म्हणजे, पावसाच्या एकूण १५० दिवसांत फक्त ३९ दिवस पाऊस झाला. मराठवाड्यात पेरणी झालेल्या ४८.१० लाख हेक्टरपैकी ३५ लाख हेक्टर क्षेत्रावरील पिकं पावसाअभावी करपली. अवर्षणाच्या छायेत (रेड झोनमध्ये) राज्यातले सांगली, सातारा, सोलापूर, बीड, धाराशिव, हिंगोली, जालना, अकोला आणि अमरावती असे एकूण नऊ जिल्हे राहिले. तर नांदेड, पालघर, ठाणे व मुंबई उपनगर इथेच फक्त काही काळ अतिवृष्टी झाली.१९५१ ते २०१९ या कालावधीतील आकडेवारीनुसार दरवर्षी किमान आठ ते १० जिल्ह्यांत अतिवृष्टी होते. १५ ते १८ जिल्ह्यांत मुसळधार पाऊस होतो. दोन ते तीन जिल्हे अवर्षणाच्या छायेत राहतात. यामध्ये सोलापूर, धाराशिव, बीड आणि अहमदनगर जिल्ह्यांचा समावेश होतो. अतिमुसळधार ते अतितीव्र मुसळधार पावसाची शक्यता सातारा, कोल्हापूर, पुणे, रत्नागिरी आणि रायगड या सह्याद्रीलगतच्या जिल्ह्यांत असते. यंदा, कोकणात सरासरीच्या ११ % अधिक पाऊस पडला. मात्र, हा कमी कालावधीत जास्त प्रमाणात पडल्याची नोंदही घ्यायला हवी. याचा भात आणि नाचणी पिकांवर परिणाम झाला असून यावर्षी उत्पन्नात घट होणार आहे.मराठवाड्यात सरासरीच्या उणे ११ %, विदर्भात सरासरीच्या उणे २ % आणि उर्वरीत महाराष्ट्रात सरासरीच्या १२ % कमी पाऊस झाला. महसूल विभागांपैकी कोकणात सरासरीच्या ९९.७१ % नाशिक विभागात सरासरीच्या ६७.१८ %, पुणे विभागात ५७.१८ %, औरंगाबाद विभागात ७६ %, अमरावती विभागात ८५.९२ % तर नागपूर विभागात ९९ % पाऊस झाला. महाराष्ट्राची भाग्यलक्ष्मी म्हटलं जाणारं कोयना धरण यावर्षी एकदाही ओसंडून वाहिलं नाही. संपूर्ण आकडेवारीवरून लक्षात येतं की महाराष्ट्रात सरासरीच्या एकूण ८५ % पाऊस झाला आहे. एवढा पाऊस राज्यासाठी समाधानकारक नाही. शिवाय यंदा २३ जिल्हे तहानलेले राहिले. विदर्भात सरासरीच्या उणे २ % इतकी कमी तूट असली तरी, शेतीचं अतोनात नुकसान झालं आहे. यवतमाळला आणि नागपूरला ढगफुटीसदृश्य पावसाने झोडपून काढलं. याचा शेतकरी वर्गावर मोठा परिणाम झाला आहे. बहुतांश अल्पभूधारक शेतकरी खरिपात आंतरपिके म्हणून कडधान्ये करतात. उशिरा आलेल्या पावसाने सोयाबीन आणि भाजीपाला यांचा हंगामच लांबला. नंतर पावसाने ओढ दिल्याने उत्पन्न घटले. जे काही हाती मिळालं त्याचा दर्जाही निकृष्ट असल्याने अल्पभूधारक शेतकऱ्यांचं अर्थकारण कोलमडून पडलं आहे. तर मोठ्या शेतकऱ्यांना पिकं वाचवण्यासाठी पाण्याची अतिरिक्त सोय, अतिरिक्त विद्राव्य खतं, कीटकनाशकं, फवारण्या, अतिरिक्त मजूर वा आंतरमशागत करण्यासाठी अव्वाच्या सव्वा भुर्दंड बसला आहे.एकट्या विदर्भातच वर्षभरात सुमारे १,५६७ शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या आहेत. राज्याच्या कृषी विभागच्या गलथान कारभारामुळे 'एक रुपयात पीकविमा' योजनेत सहभागी एक लाख ७० हजार शेतकऱ्यांचा १,५५१ कोटी रुपयांचा विम्याचा हप्ता सरकारने विमा कंपन्यांना वेळेवर भरला नाही. त्यामुळे २५ % अग्रिम पीकविमा भरपाई देण्यास पीकविमा कंपन्या नकार देत आहेत. शेतकरी पीकविम्याच्या लाभापासून वंचित राहिले आहेत. राज्यात खरिपाच्या पेरण्या झालेल्या १४२ लाख हेक्टरपैकी पंतप्रधान पीक विमा योजनेत सहभागी आणि लाभवंचित अशा शेतकऱ्यांच्या पिकांचं क्षेत्र ११३ लाख हेक्टर आहे. प्रत्यक्ष पाहणी होऊन, पीकनिहाय आणि मंडलनिहाय संयुक्त तपासणी होईल, तेव्हाच विमा रकमेची स्थिती स्पष्ट होईल. त्यातही, १६ जिल्ह्यांत सलग २१ दिवसांचा पावसाचा खंड पडला नाही. व उत्पन्नात ५० % घट नाही या अटी भरपाई नाकारण्यासाठी वापरून विमा कंपन्या आडमुठेपणा करतात. राज्याच्या कृषी विभागाचे अतिरिक्त मुख्य सचिव, अनुपकुमार यांनी जाहीर केलं आहे की, विमा कंपन्यांच्या वादग्रस्त भूमिकांमुळे पीक विम्यासंदर्भात अनेक प्रश्न निर्माण होत आहेत. पीकविमा कंपन्यांनी शेतकऱ्यांना नीट भरपाई दिली जावी अशा सूचना केंद्र शासनानेच द्याव्यात. केंद्रीय कृषिमंत्र्यांकडे ही मागणी केलीच आहे.कृषी आयुक्तालयाकडून मिळालेल्या माहितीनुसार, शेतकऱ्यांच्या विमा हप्त्याचे एक हजार ३४ कोटी रुपये अद्यापही राज्य शासनाने विमा कंपन्यांना अदा केलेले नाहीत. यावर्षी पंतप्रधान पीकविमा योजनेअंतर्गत एक कोटी ७० लाख शेतकऱ्यांनी पीकविमा काढला. एक कोटी ७० लाख शेतकऱ्यांची पिकविम्यापोटी विमा कंपन्यांना द्यावयाची रक्कम होते चार हजार ७५० कोटी रुपये. यापैकी केंद्र सरकारचा वाटा तीन हजार २०० कोटी रुपयांचा आणि राज्य सरकारचा एक हजार ५५० कोटी रुपये इतका आहे. पैकी केवळ ५१६ कोटी रुपये राज्य शासनाने अदा केले आहेत. राज्य शासनाने पिकविम्याची रक्कम न भरल्याने कंपन्या शेतकऱ्यांना भरपाई देण्यास टाळाटाळ करत आहेत. यावर कृषीमंत्री धनंजय मुंडे यांनी राज्यातील शेतकऱ्यांच्या खात्यात पीकविम्याचा २५ % अग्रीम दिवाळीच्या आत जमा करण्याचा राज्य शासनाचा प्रयत्न असल्याची माहिती दिली. म्हणजे अजून महिनाभर तरी शेतकऱ्यांना नुकसान भरपाई मिळण्याची शक्यता कमी आहे.मग कृषी क्षेत्रासाठी अर्थसंकल्पांत केलेल्या तरतुदी आणि पुरवणी मागण्या या निव्वळ घोषणा आहेत का, अर्थसंकल्पीय तरतुदींसह पुरवणी मागण्यांतील कोटींची उड्डाणे गेली तरी कुठे हे प्रश्न पडतात. विधिमंडळाच्या पावसाळी अधिवेशनात एकूण ४१,२४३ कोटी रुपयांच्या पुरवणी मागण्या सादर करण्यात आल्या होत्या. त्यामध्ये अल् निनोच्या मान्सूनवरील प्रभावामुळे जलजीवन मिशन सर्वसाधारण घटक, गुणवत्ता संनियंत्रण आणि सर्वेक्षण यासाठी ५,८५६ कोटी; तसंच शेतकरी आणि कृषी क्षेत्रासाठी चार हजार कोटी रुपयांची मागणी मंजूर झाली होती. हे आकडे लोकांना खूष करण्यासाठी असतात का? शेतकऱ्यांच्या पीक कर्जाचं पुनर्गठनही केलेलं नाही. कृषी विभागाच्या सर्वेक्षणानुसार राज्यातील अंदाजे २० जिल्ह्यांमधील शेतकऱ्यांचं सरासरी ७० ते ९० टक्के नुकसान झाले. त्यामुळे यावर्षी खरिपाच्या उत्पन्नात मोठी घट होणार आहे. याचा परिणाम साहजिकच रब्बीच्या हंगामावर होणार आहे. त्यामुळे काळाची गरज ओळखून रब्बी हंगामासाठी सरकारने तयारी करणं आवश्यक आहे. शेतमालाच्या उत्पन्नात होणारी घट व्यापाऱ्यांसाठी कमाईची आयती संधी असते. अशा वेळी ग्राहकालाही भुर्दंड बसणार नाही याकडे शासनाने लक्ष देणे आवश्यक आहे.महाराष्ट्रासारखं 'डबल इंजिन' सरकार शेजारच्या कर्नाटक राज्यात नाही. महाराष्ट्रातल्या कमी पर्जन्यमानामुळे कर्नाटकातही ४१ लाख हेक्टर जमिनीवरची पिकं धोक्यात आली. म्हणून कर्नाटक सरकारने तिथल्या एकूण २२० तालुक्यापैंकी १९५ तालुक्यांत दुष्काळ जाहीर केला. पाणीटंचाईवर उपाय म्हणून जिल्हा पंचायतीच्या मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांकडे प्रत्येकी एक कोटी रुपयांचा निधी वर्ग केला. दुष्काळ जाहीर केलेल्या १९५ पैकी १६१ तीव्र टंचाईग्रस्त तालुक्यांसाठी जिल्हाधिकाऱ्यांकडे ४६२ कोटी रुपयांचा निधी वर्ग केला. भविष्यातील चाराटंचाईची शक्यता ध्यानात घेऊन आधीच निधीची तरतूद केली. शिवाय केंद्र सरकारच्या दुष्काळ निवारण निकषांनुसार आढावा घेवून आत्तापर्यंत ६हजार कोटी रुपयांच्या पॅकेजची मागणी करणारा अहवाल तयार केला. महाराष्ट्रातल्या 'डबल इंजिन' सरकारला कृषी क्षेत्रातली धोक्याची घंटा नीटशी ऐकू आलेली नाही, याचा खेद वाटतो. आगामी काळात महाराष्ट्र सरकार रब्बी हंगाम तरी गांभीर्याने घेत योग्य त्या उपाययोजना करेल या आशेवर महाराष्ट्रातील जनता दुष्काळझळा सोसते आहेत.

# ईडी, पीएमएलए कायद्यासमोर पुन्हा आव्हान

सर्वोच्च न्यायालयाने पंकज बन्सल याचिकेदरम्यान नुकतीच अंमलबजावणी संचालनालयास त्यांच्या मर्यादित आणि कायदेशीर कर्तव्यांची जाणीव करून दिली आहे. प्रतीक राजूरकर अंमलबजावणी संचालनालय पुनर्विचार याचिका दाखल करणार असले तरी न्यायालयाने कान टोचले, हे वास्तव तर नाकारता येणार नाही.

सर्वोच्च न्यायालयाने पंकज बन्सल याचिकेदरम्यान नुकतीच अंमलबजावणी संचालनालयास त्यांच्या मर्यादित आणि कायदेशीर कर्तव्यांची जाणीव करून दिली आहे. सर्वोच्च न्यायालयाने 'आम्ही ठरवू तीच प्रक्रिया आणि आम्ही ठरवू तोच गुन्हेगार' या अंमलबजावणी संचालनालयाच्या वृत्तीला चाप लावला. सर्वोच्च न्यायालयाने या प्रकरणात दिलेल्या निकालाच्या विरोधात आता अंमलबजावणी संचालनालय पुनर्विचार याचिका दाखल करणार असल्याचे समजते आहे. कायदेशीर पर्यायांचा वापर करण्याचा तपास यंत्रणांना अधिकार आहेच, परंतु एकंदर दाखल झालेल्या गुन्ह्यातील शिक्षेचे प्रमाण आणि गुन्हे दाखल होण्याचे प्रमाण बघता केंद्र सरकारप्रमाणेच केंद्रीय तपास यंत्रणांनाही कायद्यापेक्षा तपासावर आपली एकाधिकारशाही कायम ठेवायची आहे, असेच प्रतीत होते. केंद्रीय तपास यंत्रणांची कार्यपद्धती बघता त्यांना गुन्हे सिद्ध होण्यापेक्षा पीएमएलए कायद्याच्या तरतुदींचा गैरवापर करत केवळ गुन्हे दाखल करणे आणि अटक करणे यातच स्वारस्य असल्याचे दिसते. या कायद्यात आजवर झालेल्या अत्यल्प शिक्षा या अंमलबजावणी संचालनालयाच्या राजकीय हेतूंकडे अंगुलिनिर्देश करणाऱ्या आहेत.गेल्या काही वर्षांत हे संचालनालय आणि त्यांच्या अखत्यारीत येणाऱ्या पीएमएलए कायद्याच्या विश्वासार्हतेवर मोठे प्रश्नचिन्ह उपस्थित झाले आहे. केंद्र सरकार, तपास यंत्रणा अद्यापही याबाबत जनतेच्या मनातील शंकांचे उत्तर देऊ शकलेल्या नाहीत. तर दुसरीकडे तपास यंत्रणांवर वाढता दबाव, कायद्याचा वाढता गैरवापर, मनाप्रमाणे कायद्याची अंमलबजावणी आणि व्याख्या निश्चित करण्याचे घटनाबाह्य कार्य तपास यंत्रणा करताना दिसताहेत. न्यायालयीन अधिकारांच्या कक्षेत जात अंमलबजावणी संचालनालयाने आपल्या मर्यादा ओलांडण्याचेही अनेकदा प्रयत्न केले. याच कारणास्तव सर्वोच्च न्यायालयाचा पंकज बन्सल प्रकरणातील निकाल महत्त्वाचा ठरतो. तो समजून घेण्यासाठी अंमलबजावणी संचालनालय तसेच पीएमएलए कायद्याच्या न्यायालयीन आणि प्रशासकीय इतिहासाकडे एक कटाक्ष टाकणे गरजेचे आहे. २०१७ साली सर्वोच्च न्यायालयाने पीएमएलए कायद्यातील कलम ४५ बाबत निकाल देत राज्यघटनेच्या अनुच्छेद १४ आणि २१ चे उल्लंघन करणारी तरतूद असल्याने घटनाबाह्य ठरवली. केंद्र सरकारने पीएमएलए कायद्यात जामीन मिळू नये यासाठी ती तरतूद अधिक कठोर करत त्यात सुधारणा केली. २०२२ साली सर्वोच्च न्यायालयाने विजय मंडल चौधरी विरुद्ध केंद्र सरकार प्रकरणात त्यातील जामिनासाठी गरजेच्या जुळय़ा तरतुदी सांविधानिक असल्याचा निकाल दिला. पुढे केंद्र सरकारने पीएमएलए कायद्याच्या कक्षेत विविध खात्यांना एकत्रित करत माहिती गोळा करण्याचा प्रस्ताव मंजूर करून घेतला. १८ ऑक्टोबरपासून सर्वोच्च न्यायालयाचे त्रिसदस्यीय पीठ पीएमएलए कायद्यातील अनुच्छेद ४५ बाबत सप्टेंबर २०२२ रोजी दिलेल्या निकालाचा पुनर्विचार करणार असल्याचे प्रसिद्ध झाले आहे.पंकज बन्सल प्रकरणात दोन व्यक्तींना मनी लाँडिरग प्रकरणात अटक करण्यात आली होती. सर्वोच्च न्यायालयाच्या न्या. बोपन्ना आणि न्या. संजय कुमार यांच्या द्विसदस्यीय पीठाने अंमलबजावणी संचालनालयाच्या पद्धतीवर प्रहार करत अटक बेकायदेशीर ठरवली. संचालनालयाची कृती ही सूडभावनेने तसेच पारदर्शकतेचा अभाव असल्याचे सांगत ताशेरे ओढले. अंमलबजावणी संचालनालयाने अटक करताना आरोपीला अटकेची कारणे लिखित स्वरूपात देण्याची प्रथा न्यायालयाने घालून दिली. एखादी व्यक्ती तपासात सहकार्य करत नाही म्हणून अंमलबजावणी संचालनालय तिला अटक करू शकणार नाही. अटक बेकायदेशीर असेल तर कोठडीचा आदेश बारगळेल कारण हा आदेश अटक कायदेशीर ठरवू शकत नाही, असे महत्त्वपूर्ण निरीक्षण सर्वोच्च न्यायालयाने पंकज बन्सल प्रकरणात मांडले आहे. पुढे सर्वोच्च न्यायालयाने आपल्या निकालात अंमलबजावणी संचालनालयास चौकशीसाठी बोलावलेल्या व्यक्तीकडून गुन्हा मान्य करून घेण्याची अपेक्षा चुकीची असल्याचे निरीक्षण मांडत राज्यघटनेच्या अनुच्छेद २०(३) कडे लक्ष वेधले आहे. याव्यतिरिक्त सर्वोच्च न्यायालयाने पंकज बन्सल प्रकरणात कोठडी देताना अटक कायदेशीर आहे की नाही हे तपासण्याचे आदेश दिले आहेत. अंमलबजावणी संचालनालयाकडून अटकेच्या, तपासाच्या प्रक्रियेत अनेकदा असमानता आढळून आलेली आहे, असे अनेक संदर्भ देता येतील. कायद्याला अपेक्षित असलेल्या प्रक्रियेचा अवलंब व्हावा असे स्पष्ट संकेत या निकालातून सर्वोच्च न्यायालयाने अंमलबजावणी संचालनालयास दिल्याने आता अंमलबजावणी संचालनालयाने पुनर्विचार याचिकेचा कायदेशीर पर्याय स्वीकारल्याचे दिसते. वास्तविक तपास यंत्रणांनी दाखल झालेल्या गुन्ह्यात शिक्षेचे प्रमाण अत्यल्प का आहे, यावर गांभीर्याने लक्ष केंद्रित करणे गरजेचे असताना केवळ अटकेवर लक्ष केंद्रित केल्याने केंद्रीय तपास यंत्रणा आणि पीएमएलए कायद्याच्या विश्वासार्हतेवर मोठे प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.कुठलाही कायदा हा राज्यघटनेपेक्षा वरचढ ठरू शकत नाही. अनुच्छेद २२(१) आणि अनुच्छेद १९(१) पीएमएलए अ नुसार आरोपीला अटकेची कारणे माहीत असणे गरजेचे आहे. बन्सल प्रकरणात मौखिक स्वरूपात तशी कारणे कळवली असल्याचे प्रतिपादन अंमलबजावणी संचालनालयाने केले. तो दावा बन्सल यांनी फेटाळून लावला. त्याच कारणास्तव अंमलबजावणी संचालनालयाने अटकेची कारणे लिखित स्वरूपात द्यावीत असे निर्देश सर्वोच्च न्यायालयाने दिले. अंमलबजावणी संचालनालयाकडून ईसीआयआर दाखल करण्यात येतो. तो अंमलबजावणी संचालनालयाचा अंतर्गत दस्तऐवज असतो. बन्सल प्रकरणात आता अटकेची माहिती लिखित स्वरूपात द्यावी लागणार असल्याने अटकेतील आरोपीकडे माहिती आणि अटकेची कारणे लिखित स्वरूपात उपलब्ध असतील. याव्यतिरिक्त संबंधित व्यक्ती तपासात सहकार्य करत नसल्याची कारणे देत अंमलबजावणी संचालनालयाकडून होत असलेल्या अटकेला या निकालाने काही प्रमाणात अटकाव होईल. वरील दोन निर्देशांचे पालन अंमलबजावणी संचालनाकडून न झाल्यास बन्सल प्रकरणात दिलेल्या आदेशानुसार कोठडी देताना कनिष्ठ न्यायालयास अटक कायदेशीर आहे अथवा नाही याची कायदेशीर चिकित्सा करणे क्रमप्राप्त ठरेल. पीएमएलए कायद्यानुसार कलम ४५ बाबत पुनर्विचार याचिका सर्वोच्च न्यायालयात सुनावणीसाठी आल्यास त्यावर अगोदर त्रिसदस्यीय पीठाने घेतलेल्या निकालाचा निश्चितच आढावा घेतला जाईल. २०१४ सालानंतर अंमलबजावणी संचालनालयाने गुन्हे नोंदवण्याची आणि अटक करण्याची जी प्रक्रिया अवलंबलेली आहे त्याबाबत सहा वर्षांत तिसऱ्यांदा पुनर्विचार करण्याची वेळ येते, हेच कायद्याचा गैरवापर झाल्याचे अधोरेखित करणारे आहे. शिवाय याआधी म्हणजे २००५ पासून गेल्या वर्षी जुलै महिन्यापर्यंत अंमलबजावणी संचालनालयाने दाखल केलेल्या ५ हजार ४२२ खटल्यांच्या निष्पक्षपातीपणावर प्रश्नचिन्ह निर्माण करणारे आहे. विशेष करून २०१४ नंतर, कारण अंमलबजावणी संचालनालयाने दाखल केलेल्या एकूण खटल्यांपैकी ९५% खटले हे २०१४ सालानंतरचे आहेत. थोडक्यात काय तर पंकज बन्सल अथवा नियोजित पुनर्विचार याचिका बघता अंमलबजावणी संचालनालय आणि पीएमएलए कायद्याची निष्पक्षता आणि कार्यपद्धती पुन्हा एकदा कायद्याच्या निकषावर किती प्रभावी ठरते हे बघावे लागेल.

असे टोचले ईडीचे कान! सर्वोच्च न्यायालयाने पंकज बन्सल प्रकरणाच्या सुनावणीदरम्यान ''ईडीने पारदर्शक, निष्पक्षता आणि सत्यतेच्या मूलभूत मापदंडांचं पालन केलं पाहिजे. ईडी ही देशातील आर्थिक गुन्ह्यांना आळा घालणारी एक प्रमुख तपास यंत्रणा असल्याने, ईडीची प्रत्येक कृती पारदर्शक, कायदेशीर आणि न्याय्य मानकांशी सुसंगत असणं अपेक्षित आहे,'' अशा शब्दांत ईडीला फटकारलं. एमथ्रीएम ग्रुपचे संचालक पंकज बन्सल व बसंत बन्सल यांना ईडीने काही दिवसांपूर्वी आर्थिक गैरव्यवहार प्रकरणात अटक केली होती. अटकेचं कारणही ईडीच्या अधिकाऱ्यांनी त्यांना तोंडी वाचून दाखवलं होतं. या संदर्भात न्यायालयाने ईडीला फटकारताना ''अटकेवेळी आरोपींना अटकेच्या कारणांची एक लेखी प्रत देणं आवश्यक'' असल्याचं नमूद करत अटक बेकायदा ठरवून त्यांच्या सुटकेचे आदेश दिले. ''ईडीकडून समन्समधून आरोपींवर करण्यात आलेल्या आरोपांना प्रतिसाद देण्यात आरोपींना अपयश आलं, म्हणजे कलम १९ अंतर्गत त्यांना अटक करण्याचा अधिकार ईडीला मिळत नाही. कारण कलम १९ नुसार एखाद्या व्यक्तीला तेव्हाच अटक केली जाऊ शकते, जेव्हा अधिकाऱ्यांसमोर अशा काही गोष्टी असतील ज्यावरून त्यांना वाटेल की संबंधित व्यक्ती पीएमएलएनुसार दोषी आहे,'' असं न्यायालयानं या वेळी स्पष्ट केलं.

# तुम्हीही जेवणात सॉस आणि मसाले अतिरिक्त प्रमाणात वापरता का? तज्ज्ञांनी सांगितला मधुमेहाचा धोका; वाचा सविस्तर

तज्ज्ञांनी सांगितला मधुमेहाचा धोका; वाचा सविस्तर सगळ्याच गृहिणी भाज्या बनवताना त्यात वेगवेगळ्या प्रकारचे सॉस, मसाले टाकत असतात. भाजीची चव वाढवण्यासाठी त्या नेहमी सॉस, मसाले वापरतात. हे मसाले जेवणाची चव वाढवत असले तरी ते आरोग्यासाठी हानिकारक तर नाही याची खात्री करून घेतली पाहिजे. तुम्हाला आठवतंय का, तुम्ही कधी दुकानातून सॉस घेताना सॉसच्या बाटलीची मागची बाजू पाहिली आहे? घटकांचे लेबल तपासले आहे का? नाही ना ? हे लेबल योग्यरित्या वाचणे खूप महत्वाचे आहे. लेबलमध्ये सामान्यतः प्रथिने, चरबी, फायबर सामग्री, कार्बो हायड्रेट्स यांचा उल्लेख असतो. यापैकी बहुतेक सॉसमध्ये किंवा मसाल्यांमध्ये जास्त प्रमाणात साखर असते, त्यामुळे सॉस खूप कॅलरीज वाढवते. याबाबत आहारतज्ज्ञ भक्ती सामंत यांनी द इंडियन एक्स्प्रेसशी बोलताना या संदर्भात सविस्तर माहिती दिली आहे.मधुमेह हा असा आजार आहे जो झाल्याचे रुग्णाला समजतही नाही. हा आजार होण्यामागे बदलती जीवनशैली, अयोग्य आहार आणि वाढलेला ताण इत्यादी गोष्टी कारणीभूत ठरतात. आपण कितीही पथ्य पाळली तरी आपल्या नकळत काही पदार्थ आपण खातो आणि त्याचे परिणाम शरीरावर होतात. मधुमेह हा एका रात्रीत होणारा आजार नाही. आपल्या चुकीच्या सवयींमुळे हा आजार जास्त बळावतो. मधुमेहाचा आजार इतक्या झपाट्याने पसरत आहे की, आजकाल लहान मुलेही या आजाराला बळी पडत आहेत. शुगर-फ्री उत्पादनांची तपासणी शुगर-फ्री म्हणून मार्केटिंग केलेली उत्पादनं तुम्ही कितीतरी वेळा विकत घेतली असतील. पण, ती खरंच शुगर-फ्री आहेत का हे तपासलंय का. नाही तर याउलट शुगर-फ्री म्हणून त्याचा जास्तच वापर केलाय. सॉस किंवा चटपटीत मसाले जे तुम्ही पौष्टिक म्हणून खाता, त्यामध्ये साखर असते हे तुम्हाला माहिती असणे गरजेचे आहे. ज्या गोष्टीकडे आपण अनेकदा दुर्लक्ष करतो ते म्हणजे बहुतेकवेळा पौष्टिक म्हणून खातो खरं, पण त्यात सुमारे तीन ग्रॅम साखर असते, काहींमध्ये आठ ग्रॅम साखर असते. त्यामुळे तुमच्या आहारात सॉस तसेच वेगवेगळ्या प्रकारच्या चटपटीत मसाल्यांच्या वापरावर नियंत्रण ठेवले पाहिजे.चवीसोबतच फॅट्सही प्रत्येकवेळी तुम्ही तुमच्या रेसिपीमध्ये हे सॉस टाकता तेव्हा तुमच्या शरीरात चवीसोबतच फॅट्सही जातात, हे लक्षात ठेवा. तुमच्या शरीराचे जास्त नुकसान होते. त्यामुळे फॅटी लिव्हर, खराब त्वचा आणि केस, हृदयविकार, नैराश्य, चिंता इत्यादींशी संबंधित समस्या होऊ शकतात. तसेच यामुळे वजन वाढू शकते आणि मधुमेह वाढू शकतो. साखरेमुळे ही उत्पादने घातक ठरू शकतात, त्यामुळे हे टाळण्याचा सल्ला डॉक्टर देतात. गरजेपेक्षा जास्त तहान, जास्त भूक, कोरडे तोंड, जखम भरण्यास वेळ लागणे आणि वारंवार लघवीला होणे ही मधुमेहाची लक्षणे आहेत. निरोगी आहार आणि जीवनशैली निरोगी व्यक्तीच्या रक्तातील साखरेची सामान्य पातळी ९० ते १०० mg/dl दरम्यान असते. जर एखाद्याने निरोगी आहार आणि जीवनशैलीचे पालन केले तर साखरेची सामान्य पातळी राखणे सहज शक्य आहे. रक्तातील साखरेचे प्रमाण नियंत्रित करणे मोठे आव्हान असते. साखरेचे प्रमाण वाढल्याने मधुमेहासोबतच उच्च रक्तदाब, हृदयविकार आदी विविध समस्या निर्माण होत असतात. त्यामुळे बहुतेक लोक रक्तातील साखरेच्या पातळीबाबत जागरूक असतात.

## जीसीसी टीबीसी संगणकीय टायपिंग मॅन्युअल टायपिंग व लघुलेखन प्रवेश सुरु. अनधिकृत प्रवेश देणाऱ्या संस्थांवर गुन्हे दाखल करणार डॉ. नंदकुमार बेडसे.

पुणे :- महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद, पुणे यांच्याशी सलग्न असलेल्या जीसीसी टीबीसी संगणकीय टंकलेखन परीक्षा एप्रिल २०२४ साठी राज्यातील सर्व मान्यताप्राप्त संस्थांमधून ऑनलाईन प्रवेश प्रक्रिया सुरु झाली आहे. अशी माहिती महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेचे अध्यक्ष डॉ. नंदकुमार बेडसे यांनी दिली. हे प्रवेश दि.०१/१०/२०२३ पासून सुरू झालेले आहेत. तरी सर्व इच्छुक विद्यार्थ्यांनी महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेने जाहीर केलेल्या र्हीींिः//ु.गीलशींपिश.ळप/ सलल/उद्धखछड्ढचणचइ-ङ.शीु यि लिंकवर आपल्या जिल्हयातील तालुक्यातील गावातील शहरातील जवळच्या मान्यताप्राप्त टायपिंग संस्थांची यादी तपासून पहावी. त्यानंतर त्या संस्थेला महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेने दिलेल्या ई.प्रमाणपत्रावरील त्याच संस्थेचे नाव व पत्ता बरोबर आहे का? याची खातरजमा करूनच प्रवेश घ्यायचा आहे. अन्य नियमबाह्य संस्थांमधून संगणकीय टायपिंगसाठी प्रवेश घेऊन विद्यार्थ्यांनी आपली फसवणूक करून घेऊ नये, असे आवाहनही त्यांनी विद्यार्थी व पालकांना केले आहे. महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद पुणे तर्फे राज्यभरात जीसीसी टीबीसी संगणकीय टायपिंग परीक्षा वर्षातून दोन वेळा घेतल्या जातात. यामध्ये मराठी ३० व ४० हिंदी ३० व ४० व इंग्रजी ३०,४० व ५० शब्द प्रति मिनिट गतीच्या परीक्षा असतात, प्रत्येक विषयासाठी सहा महिन्यांचा हा कोर्स असून याची प्रती विषय रु.६५००/- इतकी फी आकारली जाते एकाहून अधिक विषय घेतल्यास रूपये ६५०० ु विषय अशी फी आकारण्यात येते. त्याचबरोबर लघुलेखन ( ड्ढोंहरपव ) परीक्षा देखील परिषदेमार्फत घेतल्या जातात. त्यामध्ये मराठी, हिंदी व इंग्रजीच्या ६० ८०, १०० व १२० अशा शब्द गतीच्या परीक्षा असतात. त्याचेही प्रवेश आता सुरु झालेले आहेत, तर मशीनवरील टायपिंगमध्ये मराठी व हिंदी ३० व ४० तर इंग्रजीमध्ये ३०.४०, ५० व ६० अशा शब्दगतीच्या परीक्षा घेतल्या जातात. अशी माहिती दिली. मागील परीक्षेपासून आम्ही जीसीसी टीबीसी परीक्षा अर्ज भरताना काही नवीन सूचना केलेल्या आहेत. त्यानुसार अनधिकृत प्रवेशांना आळा घालण्यास मदत होणार आहे. त्याचबरोबर आता संस्थेमध्ये कोर्सला प्रवेश घेतानाच परीक्षेचा प्राथमिक अर्ज ऑनलाइन भरून घेतला जाईल. त्यामुळे नंतर ऐनवेळी परीक्षा अर्ज भरून घेणे किंवा क्षमतेपेक्षा जास्त विद्यार्थी भरणे या गैरप्रकारांना आपोआपच आळा बसेल असे अध्यक्षांनी सांगितले. आमची संस्था मान्यताप्राप्त असून आमच्याकडे प्रवेश घ्या व निश्चिंत राहा, आमच्याकडे पण शासनाची परवानगी आहे. अशा प्रकारची खोटी व दिशाभूल करणारी माहिती देऊन अनेक विद्यार्थ्यांना फसविण्याच्या घटना समोर आल्या आहेत त्याचबरोबर पास करून देण्याची हमीहीकाही संस्थाचालक देतात व अधिक पैसे घेऊन विद्यार्थ्यांची दिशाभूल करतात. या दुष्टचक्रात विद्यार्थ्यांनी व पालकांनी पडू नये, खोटया अमिशांच्या आहारी जाऊ नये, असे आव्हान यावेळी डॉ. बेडसे यांनी केले.. महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेने यावर्षीपासून प्रत्येक जिल्हयातील प्रत्येक विषयातील सर्वाधिक गुण मिळविलेल्या पाच विद्यार्थ्यांची नावे जाहीर करून त्यांचा सत्कार करण्याचा उपक्रम जाहीर केलेला आहे. त्यानुसार अलिकडेच ती यादी जाहीर करण्यात आलेली आहे. हे नमुद करीत डॉ. बेडसे यांनी भविष्यात विविध उपक्रमांच्या माध्यमातून जीसीसी टीबीसी संगणकीय टायपिंग व लघुलेखन या विषयांमध्ये सकारात्मक बदल करण्याचा मानस जाहीर केला. शिवाय महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद आता अनधिकृत संस्था व विद्यार्थी बसविणाऱ्यांवर कडक नजर ठेवून आहे, हे आता दिसून येईलच. त्यामुळे कोणत्याही मान्यताप्राप्त संस्थांनी नियमबाह्य कामे करू नये, नियमबाह्य संस्थांचे विद्यार्थी परीक्षेसाठी घेऊ नयेत व तसे दिसून आल्यास कडक कार्यवाहीसाठी तयार राहावे, असा सूचक इशाराही संस्थाचालकांना दिलेला आहे. त्यानंतरही कोणी अशा प्रकारे अनधिकृत व नियमबाह्य काम करताना आढळल्यास त्यांच्यावर गुन्हे दाखल करून मान्यता रद्द करण्यात येईल असेही शेवटी डॉ. नंदकुमार बेडसे यांनी स्पष्ट केले.

## शरीराची ठेवण योग्य नसेल तर तुमच्या मेंदूवर वाईट परिणाम होऊ शकतो का? वाचा, तज्ज्ञ काय सांगतात

तुम्ही कधी विचार केला आहे का, शरीराची ठेवण योग्य नसल्यामुळे आपल्या आरोग्यावर परिणाम होतो का? याविषयी द इंडियन एक्सप्रेसच्या एका वृत्तात एसआरव्ही हॉस्पिटलच्या फिजियोथेरेपिस्ट डॉ. ऐश्वर्या अहलीवाले सांगतात, शरीराची ठेवण योग्य नसल्यामुळे तुमच्या स्नायूंवर ताण वाढू शकतो, ज्यामुळे मेंदूपर्यंत रक्त पोहचण्यास अडचण निर्माण होऊ शकते. वर्क फ्रॉम होममुळे एका जागी बसून काम करण्याची अनेकांना सवय आहे. काही लोक दीर्घकाळ एकाच जागी बसून राहतात. पण, तुम्ही कधी विचार केला आहे का, शरीराची ठेवण योग्य नसल्यामुळे आपल्या आरोग्यावर परिणाम होतो का? याविषयी द इंडियन एक्सप्रेसच्या एका वृत्तात एसआरव्ही हॉस्पिटलच्या फिजियोथेरेपिस्ट डॉ. ऐश्वर्या अहलीवाले सांगतात, शरीराची ठेवण योग्य नसल्यामुळे तुमच्या स्नायूंवर ताण वाढू शकतो, ज्यामुळे मेंदूपर्यंत रक्त पोहचण्यास अडचण निर्माण होऊ शकते.केअर हॉस्पिटलचे न्यूरोसर्जन डॉ. के. व्ही. शिवानंद रेड्डी याविषयी सांगतात, शरीराची ठेवण योग्य नसल्यामुळे तुमच्या देहबोलीवर किंवा आत्मविश्वासावर नकारात्मक परिणाम होऊ शकतो, ज्यामुळे समोरची व्यक्ती तुम्हाला कसे समजून घेतो, याचासुद्धा अप्रत्यक्षरित्या तुमच्या मानसिक आरोग्यावर किंवा मेंदूवर परिणाम दिसून येतो. डॉ. के. व्ही. शिवानंद रेड्डी पुढे सांगतात, जर शरीराची ठेवण योग्य असेल तर ऑक्सजिन घेण्यास मदत होते आणि तुमच्या मानेचा आणि पाठीचा ताण कमी होऊ शकतो, ज्याचा थेट सकारात्मक परिणाम तुमच्या मेंदूच्या आरोग्यावर दिसून येईल.

डॉ. ऐश्वर्या अहलीवाले पुढे सांगतात, नियमित व्यायाम करून तुम्ही मेंदूचे आरोग्य सुदृढ ठेवू शकता. डॉ. अहलीवाले यांच्या मते, शरीराची ठेवण जर चुकीची असेल आणि त्यामुळे मेंदूवर नकारात्मक परिणाम झाला असेल तर अशा परिस्थितीत त्यावर उपचार करणे ही समस्या किती प्रमाणात आहे आणि समस्या केव्हापासून आहे, यावर अवलंबून असते.

डॉ. रेड्डी यांनी स्नायूंना मजबूत करण्यासाठी आणि शरीराची ठेवण सुधारण्यासाठी फिजिओथेरेपी करण्याचा सल्ला दिला आहे. माइंडफुलनेस, वर्कस्टेशन्स आणि होम सेटअप्समुळे पाठीचा कणा आणि मानेवरील ताण कमी होण्यास मदत होऊ शकते.

अनेकदा काही प्रकरणे गंभीर असतात. अशा वेळी वैद्यकीय उपचार आणि शस्त्रक्रिया करण्याची गरज भासू शकते. पण, हे लक्षात ठेवणे गरजेचे आहे की उपचारामुळे तुम्ही तात्पुरता त्रास कमी करू शकता; पण दीर्घकालीन त्रास कमी करणे कठीण आहे. त्यासाठी डॉ. ऐश्वर्या अहलीवाले सांगतात, शरीराची ठेवण सुधारणे, हाच एक चांगला मार्ग आहे.शरीराची ठेवण कशी सुधारायची?तुमच्या संगणकाची किंवा लॅपटॉपची स्क्रीन तुमच्या डोळ्याच्या सरळ रेषेत असावी.जर तुम्ही डेस्कवर काम करत आहात तर मध्ये मध्ये ब्रेक घ्यावा.काम करताना मध्ये मध्ये उभे रहावे आणि थोडे फिरून यावे.दररोज मान, खांदे आणि पाठ स्ट्रेच करावी.स्नायूंना मजबूत करण्यासाठी नियमित व्यायाम करावा, ज्यामुळे शरीराची ठेवण सुधारते.योगा हासुद्धा एक चांगला पर्याय आहे.कोणतीही वस्तू उचलताना गुडघ्यातून वाकावे, पाठीतून वाकू नये.



## दिवसातून एकदा जेवून करताय उपवास? वजन कमी करण्याचे प्रयत्न आरोग्यावर काय परिणाम करतात, पाहा

जर तुम्ही कमी वेळा खात असाल तर तुम्ही कमी कॅलरीचे सेवन कराल आणि तुमचे शरीर ऊर्जेसाठी साठवलेल्या फॅट्स वापरू लागेल व वजन कमी होईल असा साधा विचार यामागे आहे. पण.. वजन नियंत्रणात ठेवण्यासाठी वेगवेगळे डाएट फॅड अनेकजण फॉलो करतात.

त्यातीलच एक म्हणजे दिवसातून केवळ एकाच वेळेस जेवण करणे. विशेषतः नवरात्रीच्या कालावधीत अनेकांना पूर्ण उपवास जमत नसल्यास ते एकदा जेवून व्रत करतात. या पद्धतीने अन्नाचे सेवन व परिणामी कॅलरी सुद्धा कमी करता येत असल्याने वजन कमी करता येईल असा अनेकांचा समज असतो.

## टवेन्टिवन शुगर्स लि. युनीट २ चे बॉयलर अग्निप्रदीपन संपन्न, कारखाना व्यवस्थापनाकडून गळीत हंगामासाठीची सर्व तयारी पूर्ण.

लातूर प्रतिनिधी १९ आक्टोंबर २३ :परभणी जिल्ह्यासह सोनपेठ तालुका तसेच परिसरातील शेतकऱ्यांच्या जीवनात आर्थिक बदल व्हावा यासाठी साखर उदयोग क्षेत्रात अदययावत तंत्रज्ञानाच्या सहाय्याने सन २०२० मध्ये सुरू करण्यात आलेला देवीनगर सायखेडा येथील टवेन्टिवन शुगर्स लि. युनिट २ च्या चौथ्या गळीत हंगामासाठी कारखाना सज्ज झाला असून गुरुवार १९ ऑक्टोबर २०२३ रोजी मान्यवरांच्या उपस्थितीत विधीवत पूजा करून ट्वेन्टी वन शुगर्स युनिट २ कारखान्याचे बॉयलर अग्निप्रदीपन करण्यात आले. परभणी जिल्ह्यातील सायखेडा तालुक्यातल्या देवीनगर येथे सुरू करण्यात आलेल्या टवेन्टिवन शुगर्स लि. युनिट २ चे यापूर्वी ३ गळीत हंगाम यशस्वी ठरले आहेत. सन २०२३-२४ मध्ये होणाऱ्या चौथ्या गळीत हंगामासाठी कारखाना व्यवस्थापनाकडून आवश्यक ती सर्व तयारी केली गेली असून ट्वेन्टी वन शुगर्सची यंत्रणा सज्ज ठेवण्यात आली आहे.ट्वेन्टी शुगर्स लि.युनिट २ देवीनगर सायखेडाचा २०२३-२४ करिता गळीत हंगाम लवकरच सुरू होत आहे. या अनुषंगाने गुरूवार दि १९ ऑक्टोबर २०२३ रोजी सकाळी

कारखाना साईट, देवीनगर सायखेडा ता. सोनपेठ जि.परभणी या ठिकाणी गळीत हंगाम २०२३-२४ बॉयलर अग्निप्रदीपन समारंभ टवेन्टिवन शुगर्स लि.चे व्हा.चेअरमन विजय देशमुख यांच्या प्रमुख उपस्थितीत कार्यकारी संचालक श्री.सुभाष पाटील व सौ.मालन पाटील उभयताच्या हस्ते विधीवत पूजन करून संपन्न झाले. सोनपेठ तालुका तसेच परभणी जिल्हयासह नजीकच्या परीसरातील अतिरीक्त ऊसाचा प्रश्न कायमस्वरूपी मार्गी लावण्याकरीता राज्याचे माजी वैदयकीय शिक्षण व सांस्कृतिक कार्यमंत्री तथा लातूर जिल्हयाचे माजी पालकमंत्री आमदार अमित विलासराव देशमुख यांच्या नेतृत्वाखाली अत्यंत कल्पकतेने साखर उदयोगातील अदययावत तंत्रज्ञानाचा वापर करून टवेन्टिवन शुगर्स लि.युनीट २ ची २०२० मध्ये सुरुवात करण्यात आली. सोनपेठ तालुक्यासह परभणी जिल्हयातील अधिकाधिक ऊसाचे गाळप करणे या कारखान्यामूळे शक्य झाले. परभणी जिल्हा तसेच परीसरातील ऊस उत्पादक शेतकऱ्यासाठी ट्वेन्टी वन शुगर्स युनिट २ देवीनगर सायखेडा हा कारखाना अत्यंत फायदेशीर ठरला आहे. लवकरच सुरू होत असलेल्या गळीत हंगामाकरिता कारखान्याची यंत्रणा सज्ज झाली असून त्यासाठी ट्वेन्टी वन शुगर्सच्या युनिट २ च्या सर्व विभागानी जय्यत



तयारी केली आहे. सर्व सभासद व ऊस उत्पादकांच्या उसाचे वेळेवर गाळप करण्यासाठी पूर्ण नियोजन करण्यात आले असून टवेन्टिवन शुगर्स लि.युनिट २ कडून हंगामात गाळप झालेल्या उसाला चांगला ऊसदर देण्यात येणार असल्याचे व्यवस्थापनाकडून सांगण्यात आले आहे. या प्रसंगी खातेप्रमुख व विभाग प्रमुख सर्वश्री गोविंद देशमुख, श्री.रसाळ, श्री.निलेश माने, श्री.धर्मेंद्र गदाळे,श्री. तुकाराम गडदे, श्री.अजित देशमुख,श्री. घुगे,श्री.जि.टी.मुंडे,श्री.विनोद औटे,श्री.स्वप्नील कुंभार, श्री.आर.आर.जाधव,श्री.ज्ञानोबा शिरसाठ, श्री.संजय साळुंके यांच्यासह ट्वेन्टी वन शुगर्सचे अधिकारी, कर्मचारी,सभासद,ऊस उत्पादक शेतकरी व कामगार उपस्थित होते.

## दयानंद विज्ञानमध्ये ' पदवी व पदव्युत्तर शिक्षणानंतर स्पर्धा परीक्षा आणि करिअरच्या संधी ' या विषयावर मार्गदर्शन



लातूर : येथील दयानंद विज्ञान महाविद्यालयातील स्पर्धा परीक्षा कमिटी व इन्स्टिट्यूट फॉर डव्हान्स्ड स्टडीज (आयएफएएस) यांच्या संयुक्त विद्यमाने दि.१७ ऑक्टोंबर २०२३ रोजी ' पदवी व पदव्युत्तर शिक्षणानंतर स्पर्धा परीक्षा आणि करिअरच्या संधी ' या विषयावर एक दिवसीय ऑनलाईन वेबिनारचे आयोजन करण्यात आलेले होते.महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. जयप्रकाश दरगड व उपप्राचार्य डॉ.सिद्धेश्वर बेल्लाळे यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित करण्यात आलेल्या या वेबिनारप्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून पुणे येथील प्रा.ओंमकार गिरकर,वेबिनार समन्वयक डॉ. गजानन बने,अंजली विश्वकर्मा,प्रा.मेघा पंडित,डॉ. रवींद्र शिंदे,प्रा.राहुल जाधव,डॉ.रामशेट्टी शेटकार यांची प्रमुख उपस्थिती होती. याप्रसंगी साधन व्यक्ती प्रा.ओंमकार गिरकर यांनी बी.एस्सी.पदवी व एम.एस्सी.पदव्युत्तर वर्गाच्या विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करत असताना स्पर्धा परीक्षेच्या माध्यमातून करिअर कसे घडविले पाहिजे,या संदर्भातील यशस्वीतेचे तंत्र आणि मंत्र सांगितले.शिवाय पदवी व पदव्युत्तरनंतर स्पर्धात्मक स्तरावरील परीक्षा क्रॅक करण्याची रणनीती व स्पर्धात्मक स्तरावरील परीक्षा उत्तीर्ण करण्याचे धोरण कसे आखले पाहिजे याविषयी माहिती सांगितली.याचबरोबर आयआयटी-जाम,

सीएसआयआर-नेट,गेट,सेट या परीक्षांची तयारी कशी करायची आणि त्याचे नियोजन कसे करायचे याविषयीही सविस्तर असे मार्गदर्शन केले.याप्रसंगी महाविद्यालयातील राजेसाहेब पांचाळ,हरिओम पाटोळे यांच्यासह इतर प्राध्यापक, शिक्षकेत्तर कर्मचारी आणि बी.एस्सी. पदवी व एम.एस्सी.पदव्युत्तरचे विद्यार्थी गुगल मिटच्या माध्यमातून ऑनलाईन आणि ऑफलाईन पद्धतीनेही उपस्थित होते.

## समाजकल्याण विभागाने मनपाकडे वर्ग केलेले दिव्यांगाचे साहित्य त्वरीत वाटप करावे जननायक संघटना शहर जिल्हा शाखेचे उपायुक्तांना साकडे

लातूर दि.१९-१०-२०२३ लातूर शहरातील समाजकल्याण विभागाकडून शहरातील दिव्यांगांना लातूर महानगरपालिकेअंतर्गत दिव्यांगांचे साहित्य वाटप केले जाते. परंतु गेल्या तीन वर्षापासून दिव्यांगाचे साहित्य वाटप करण्यात आलेले नाही. त्यामुळे समाजकल्याण विभागाने मनपाकडे वर्ग केलेले दिव्यांगाचे साहित्य त्वरीत वाटप करण्यात यावे अशा मागणीचे निवेदन जननायक संघटनेचे शहर जिल्हाध्यक्ष राजेश पवार यांच्या उपस्थितीत मनपा उपायुक्तांना देण्यात आले आहे.समाजकल्याण विभाग लातूर येथील दिव्यांगांचे साहित्य यामध्ये अपंगाला लागणार्या सायकली, अंधांच्य काट्या व इतर साहित्य वाटपाअभावी लातूर महानगरपालिकेकडे गंज खात पडून आहे. सदरील साहित्य गेल्या तीन वर्षापूर्वी समाजकल्याण विभागाने लातूर महानगरपालिकेकडे वर्ग केलेले आहे. परंतु महानगरपालिकेने मात्र दिव्यांगाचे साहित्य वाटप केलेले नाही. परिणामी लातूर महानगरपालिकेअंतर्गत येणार्या सर्व क्षेत्रीय अधिकार्यांच्या दुर्लक्षामुळे दिव्यांगाचे साहित्य धुळ खात पडून आहे. त्यामुळे समाजकल्याण विभागाने लातूर महानगरपालिकेकडे वर्ग केलेले हे दिव्यांगाचे साहित्य तात्काळ वाटप करावे अन्यथा जननायक संघटना शहर जिल्हा शाखेच्यावतीने तीव्र आंदोलन



करण्यात येईल असा ईशारा देण्यात आलेला आहे. या निवेदनावर जननायक संघटना शहर जिल्हा अध्यक्ष राजेश रमेशराव पवार, कृष्णा सारगे, शुभम माळवदे, आकाश पिटले, करण आडप्पा, मंदुमले प्रकाश, नागेश पांडे, आकाश कांबळे, प्रविण जोशी, अभिषेक यादव आदींच्या स्वाक्षर्या आहेत.

## 'मणप्पुरम'मधील अपहार प्रकरण; दीड कोटींचा मुद्देमाल जप्त

सोलापूर : मणप्पुरम फायनान्सच्या लक्ष्मी मार्केट शाखेतून ८१ बनावट प्रकरणात सोने तारण कर्ज देऊन २ कोटी ३४ लाख ५२ हजार ३९६ रुपयांचा अपहार केल्याप्रकरणी शाखाधिकारी वृषाली विनीत हुंडेकरी (रा. सोलापूर) यांच्यासह चौघांना अटक करण्यात आली. सोन्याच्या दागिन्यांसह एक कोटी ५१ लाख रुपयांचा मुद्देमाल हस्तगत केला. शहर गुन्हे शाखेने ही कारवाई केली.पंचप्पा अर्जुन काळे (वय ५१, रा प्लॉट नं. १०, बापुजी नगर, शांती नगरजवळ, मजरेवाडी, सोलापूर), लक्ष्मीकांत यतिराज बिहाणी (वय ३७), अश्विनी यतिराज बिहाणी (वय ५७, दोघे रा. १३१५, उत्तर कसबा, सोलापूर, सध्या रा. ३२, राधाकृष्ण कॉलनी, वसंत विहार, स्पर्श हॉस्पिटलसमोर, सोलापूर) अशी अटकेतील अन्य संशयितांची नावे आहेत. याप्रकरणी मणप्पुरम फायनान्सचे एरिया हेड प्रवीण बाबुराव वरवटे यांनी फिर्याद दिली होती. त्यावरून २८ सप्टेंबर २०२३ रोजी फौजदार चावडी पोलिस ठण्यात गुन्हा दाखल झाला होता.हा गुन्हा गुंतागुंतीचा असल्याने पोलिस आयुक्त डॉ. राजेंद्र माने यांनी गुन्हे शाखेला तपासाचे आदेश दिले होते.

# लातूर शहर भाजप महिला मोर्चा तर्फे जितेंद्र आव्हाड यांचा निषेध..



लातूर दि – लिंगायत समाजाचे संस्थापक जगत ज्योती महात्मा बसवेश्वर यांच्याविषयी आक्षेपार्ह व निंदनीय विधान करत एवढ्या मोठ्या महापुरुषांचा एकेरी उल्लेख केल्याबद्दल लातूर शहर महिला मोर्चा च्या वतीने माजी मंत्री आमदार जितेंद्र आव्हाड यांचा निषेध करण्यात आला.बुधवारी भारतीय जनता पार्टी महिला मोर्चाच्या शहर जिल्हाध्यक्ष सौ. रागिणी यादव सर्व पदाधिकारी, सदस्य यांनी लातूरच्या जिल्हाधिकारी कार्यालय येथे जमा होत हा निषेध नोंदवला. तसेच यानंतर जिल्हाधिकारी यांना लेखी पत्र देत देखील जितेंद्र आव्हाड यांचा निषेध करण्यात आला.यावेळी भाजपच्या जेष्ठ नेत्या सौ.जयश्री संभाजी पाटील,महिला मोर्चा ओ. बी.सी सेलच्या शहर जिल्हाध्यक्ष हेमा येळे,महिला मोर्चाच्या सरचिटणीस प्रगती डोळसे, मंडळ अध्यख जयश्री भुतेकर,उपाध्यक्ष पूजा शेळके,शीतल पाटील आदीजण उपस्थित होते.

# बायडेन यांच्या दौ–यानंतर नेत्यानाहू नरमले

वॉशिंग्टन : हमासने इस्रायलवर हल्ला चढविला, त्यानंतर इस्रायलने युद्धाचे रणशिंग फुकले आणि गाझामध्ये होत्याच नव्हते झाले. गेल्या १२ दिवसांपासून असलेल्या तीव्र संघर्षामध्ये इस्रायल पहिल्यांदा नरमला आहे. अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष जो बायडेन यांच्या इस्रायल दौ–यानंतर इस्रायलचे पंतप्रधान बेंजामिन नेत्यानाहू यांनी गाझातील जनतेसाठी महत्वाचा निर्णय घेतला आहे. युद्ध सुरु झाल्यानंतर पहिल्यांदाच इस्रायलचे पंतप्रधान नेतन्याहू यांनी गाझामध्ये पहिल्यांदा मानवतावादी मदत पाठवण्यास परवानगी दिली आहे. इस्रायलने इजिप्तला गाझापर्यंत मानवतावादी मदत पोहोचवण्याची परवानगी दिली आहे.हमासवरील हल्ला करीत इतर बाजूंनीही कोंडी करण्यासाठी इस्रायलने गाझापट्टीतील अन्नपुरवठा बंद केला होता. गाझामध्ये इस्रायलच्या बॉम्बहल्ल्यात हजारो नागरिकांचा मृत्यू झाला आहे. तर हजारो लोक जखमी झाले असून अनेकांना कायमच अपंगत्व आलं आहे. एक दिवसापूर्वी गाझा येथील रुग्णालयात झालेल्या अज्ञात हल्ल्यात ५०० हून अधिक लोक मारले गेले. रुग्णालयावर झालेल्या हल्ल्यासाठी हमास इस्रायलला जबाबदार धरत आहे, तर इस्रायलने सर्व आरोप फेटाळत या हल्लामागे हमासचा हात असल्याचं म्हटलं आहे.

# सर्विस रोडवर पार्किंग करणाऱ्यांना मनपाचा इशारा पार्किंग केल्यास होणार १० हजाराचा दंड

लातूर/प्रतिनिधी: शहरातील रिंग रोड लगत असणाऱ्या सर्विस रोडवर वाहन चालकांनी पार्किंग करू नये.तेथे पार्किंग केल्याचे आढळल्यास मोठ्या वाहनांना १० हजार रुपये तर छोट्या वाहनांना ५ हजार रुपये दंड केला जाईल,असा इशारा मनपाच्या वतीने देण्यात आला आहे.

शहरातील राजीव गांधी चौकापासून गरुड चौकाकडे जाणाऱ्या रिंग रोड लगत सर्विस रोड तयार करण्यात आला आहे.त्या परिसरातील नागरिकांना सोय व्हावी,हायवेवरील वाहनधारकांना त्रास होऊ नये व अपघात होऊ नयेत यासाठी हायवेच्या बाजूस सर्विस रोड तयार करण्यात आले आहेत. परंतु कांही वाहन चालक या रस्त्यावर आपली वाहने पार्क करत असल्याचे मनपाच्या निदर्शनास आले आहे.नागरिकांच्या सुविधेसाठी तयार करण्यात आलेल्या सर्विस रोडचा वापर पार्किंगसाठी केला जात आहे.या रस्त्यावर पार्किंग करू नये,असे निर्देश मनपाने दिले आहेत.यापुढे या सर्विस रोडवर वाहन पार्क केल्याचे आढळले तर ट्रक व इतर मोठ्या वाहनांना १० हजार रुपये आणि छोट्या वाहनांना प्रत्येकी ५ हजार रुपये दंड केला जाईल,असा इशारा मनपा कडून देण्यात आला आहे.

या परिसरात मोठ्या संख्येने गॅरेज आहेत. चालक नादुरुस्त वाहने याच सर्विस रोडवर उभी करून दुरुस्ती करतात. यामुळे वाहतुकीचा खोळंबा होतो.यापुढे रस्त्यावर वाहने उभी करून दुरुस्ती केली जात असल्याचे दिसून आले तर गॅरेज चालकावरही कारवाई केली जाईल, असा इशारा मनपाकडून देण्यात आला आहे.

# इस्राईल–पॅलेस्टाईन मुद्द्यावर भारत आपल्या भूमिकेवर ठाम : पंतप्रधान



नवी दिल्ली : देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी गुरुवारी पॅलेस्टाईनच्या राष्ट्राध्यक्षांशी फोनवर संवाद साधून गाझा रुग्णालयावर झालेल्या हल्ल्याबाबत शोक व्यक्त केला आहे. पंतप्रधानांनी एक्सवर याबाबत माहिती दिली आहे. ते म्हणाले की, आम्ही पॅलेस्टिनी लोकांना मानवतावादी मदत पाठवत राहू. दहशतवाद, हिंसाचार आणि प्रदेशातील ढासळत चाललेल्या सुरक्षा परिस्थितीबद्दल त्यांनी आपली चिंता व्यक्त केली. इस्राईल –पॅलेस्टाईन मुद्द्यावर भारताच्या दीर्घकालीन तत्त्वनिष्ठ भूमिकेचाही त्यांनी पुनरुच्चार केला. तसेच इस्राईल–पॅलेस्टाईन मुद्द्यावर भारत आपल्या भूमिकेवर ठाम असल्याचे त्यांनी म्हटले आहे.सरकारने गुरुवारी सांगितले की, ऑपरेशन ‘अजय’ अंतर्गत ५ फ्लाइटमध्ये १२०० लोक परत आले आहेत, त्यापैकी १८ नेपाळचे नागरिक आहेत. तसेच आणखीन उड्डाणे पाठवण्याची योजना सुरू आहे. सध्या परिस्थितीचे मूल्यांकन केले जात आहे. याआधी परराष्ट्र मंत्रालयाने म्हटले होते की, गाझामध्ये चार भारतीय असून त्यांना बाहेर काढणे अवघड आहे. परराष्ट्र मंत्रालयाचे प्रवक्ते अरिंदम बागची यांनी सांगितले की, परिस्थिती सुधारताच त्यांना सुरक्षितपणे भारतात आणले जाईल. पूर्वी गाझामध्ये सुमारे ४ लोक होते परंतु आमच्याकडे ठोस आकडेवारी नाही, वेस्ट बँकमध्ये १२–१३ भारतीय लोक होते. गाझामधील परिस्थिती अशी आहे की तिथून बाहेर पडणे थोडे कठीण आहे.

# देशातील पहिल्या ‘रॅपिडेक्स ट्रेन’ला ‘नमो भारत’ नाव

नवी दिल्ली : पंतप्रधान नरेंद्र मोदी २० ऑक्टोबर रोजी देशातील पहिल्या प्रादेशिक रॅपिड ट्रान्झिट सिस्टम ट्रेनचे उद्घाटन करतील. दिल्ली–गाझियाबाद–मेरठ कॉरिडॉरच्या १७ किलोमीटर लांबीच्या रेल्वे सेवेचा पहिला टप्पा तयार झाला आहे.



या ट्रेनला ‘नमो भारत’ असे नाव देण्यात आले आहे. पहिल्या टप्प्यात साहिबाबाद ते दुहाई स्टेशनपर्यंतचा म्हणजेच १७ किलोमीटरचा मार्ग खुला केला जाईल. यामध्ये एकूण पाच स्थानकांचा समावेश आहे. हे अंतर कापण्यासाठी ट्रेनला १५–१७ मिनिटे लागतील.३०,२७४ कोटी रुपये खर्चून सुरू होत असलेल्या या प्रकल्पाचा कॉरिडॉर ८२ किलोमीटर लांबीचा असेल, तो दिल्लीतील सराय काले खान स्टेशन ते मेरठमधील मोदीपुरमपर्यंत याची लांबी आहे. मेरठ ते दिल्ली दरम्यान मेल एक्सप्रेस ट्रेनमध्ये दीड तास आणि लोकल ट्रेनमध्ये दोन तास लागतात, परंतु रॅपिड रेल्वेला फक्त ५५–६० मिनिटे लागतील.

# दिल्ली पोलिसांना ‘सर्वोच्च’ नोटीस



नवी दिल्ली : न्यूजक्लिकचे संस्थापक आणि संपादक प्रबीर पुरकायस्थ आणि एचआर प्रमुख अमित चक्रवर्ती यांच्या अटकेबाबत आज सर्वोच्च न्यायालयात सुनावणी पार पडली. न्यायमूर्ती बीआर गवई आणि न्यायमूर्ती प्रशांत कुमार मिश्रा यांच्या खंडपीठाने याप्रकरणी दिल्ली पोलिसांना नोटीस बजावली आहे.प्रबीर आणि अमित यांनी १६ ऑक्टोबरला त्यांच्या अटकेविरोधात सर्वोच्च न्यायालयात याचिका दाखल केली होती. यापूर्वी, १० ऑक्टोबर रोजी दिल्ली उच्च न्यायालयाने दोघांनाही १० दिवसांची न्यायालयीन कोठडी सुनावली होती, ती कोठडी उद्या (शुक्रवारी) २० ऑक्टोबर रोजी संपत आहे.पुरकायस्थ आणि अमित यांच्यावर चीनशी संबंधित कंपन्या आणि संस्थांकडून निधी घेऊन चिनी प्रचाराचा प्रसार केल्याचा आरोप आहे. त्यानंतर दिल्ली पोलिसांनी दोघांनाही अटक केली. अटकेबाबत सुप्रीम कोर्टात पुढील सुनावणी ३० ऑक्टोबरला होणार आहे. सीबीआयसह पाच एजन्सी न्यूजक्लिकच्या विरोधात तपास करत आहेत. प्रथम दिल्ली पोलिसांच्या स्पेशल सेलने एफआयआर नोंदवला होता. त्याआधी दिल्ली पोलिसांची आर्थिक गुन्हे शाखा, अंमलबजावणी संचालनालय(ईडी) आणि आयकर विभाग या प्रकरणाशी संबंधित वेगवेगळ्या प्रकरणांची चौकशी करत होते. केंद्रीय अन्वेषण ब्युरो (सीबीआय) ने न्यूजक्लिक विरुद्ध फॉरेन कॉन्ट्रिब्युशन रेग्युलेशन कायद्याअंतर्गत गुन्हा दाखल केला आहे.

# ज्यू कार्यकर्त्यांचा थेट अमेरिकन संसदेत प्रवेश




न्यूयॉर्क : इस्राइल आणि हमास यांच्यात युद्ध सुरू आहे. युद्धादरम्यान अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष जो बायडेन काल (बुधवार) तेल अवीव येथे पोहोचले. येथे त्यांनी इस्राइलची बाजू समजून घेतली. गाझाच्या हॉस्पिटलवर रॉकेट लाँचर पडल्यामुळे ५०० लोकांचा मृत्यू झाला त्यात इस्राइलचा काहीही सहभाग नसल्याचे देखील जो बायडेन यांनी काल स्पष्ट केले. दरम्यान, इस्राइल–हमास युद्धाचे पडसाद जगातील अनेक देशांबरोबरच अमेरिकेतही उमटत आहेत. पुरोगामी ज्यू–अमेरिकन कार्यकर्त्यांनी वॉशिंग्टनमधील अमेरिकन कॅपिटलमध्ये प्रवेश केला आणि धरणे आंदोलन केले. त्यांनी अमेरिकन काँग्रेसला गाझामध्ये युद्धविराम करण्याचे आवाहन केले. या युद्धात आतापर्यंत सुमारे पाच हजार लोकांना आपला जीव गमवावा लागला आहे. व्हाईट हाऊसजवळही ज्यू संघटनांनी असेच आंदोलन केले. अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष जो बायडेन यांच्या वॉशिंग्टन येथील निवासस्थानाबाहेर बुधवारी शेकडो निदर्शक जमले आणि त्यांनी युद्ध थांबवण्याचे आवाहन केले. गाझामध्ये काँग्रेसने युद्धविरामासाठी पुढाकार घ्यावा, अशी आंदोलकांची मागणी आहे. हजारो अमेरिकन ज्यूंनी संसदेच्या बाहेर निषेध केला, तर ३५० हून अधिक आत होते.आम्हाला अटक केली जात आहे, परंतु जोपर्यंत आम्हाला युद्धविराम आणि गाझामधील पॅलेस्टिनींचा नरसंहार थांबवण्याचे आश्वासन मिळत नाही तोपर्यंत आम्ही आंदोलन थांबवणार नाही असे ज्यू संघटनेने ट्विटरवरील पोस्टमध्ये म्हटले आहे.आंदोलकांच्या एका गटाने संसदेत प्रवेश केला होता. गाझामध्ये युद्धबंदीची मागणी करणा–या या आंदोलकांना ताब्यात घेण्यात आले आणि त्यांना अमेरिकन कॅपिटलमध्ये येण्यास बंदी घालण्यात आली. रस्ते बंद करण्याचे काम सुरू आहे. यातील तिघांना अटक करण्यात आली आहे. त्यापैकी एकाने पोलिसांवर हल्ला केल्याचे सांगण्यात येत आहे अशी माहिती अमेरिकन कॅपिटल हिल पोलिसांनी दिली आहे.

# मला मुख्यमंत्रीपद सोडायची इच्छा आहे



नवी दिल्ली : राजस्थानसह पाच राज्यांमध्ये विधानसभा निवडणुका होणार आहेत. या पार्श्वभूमीवर राजकीय वातावरण तापू लागले आहे. अशोक गेहलोत यांनी पत्रकारांशी बोलताना मुख्यमंत्रीपदाबाबत मोठे वक्तव्य केले आहे. मला राजस्थानचे मुख्यमंत्रीपद सोडायचे आहे, पण हे पदच मला सोडायला तयार नाही, असे ते म्हणाले आहेत असे वक्तव्य करुन त्यांनी सचिन पायलट यांना खिजवल्याचे बोलले जात आहे.एका महिलेने मला सांगितले की, देवाची इच्छा आहे तुम्ही चौथ्यांना मुख्यमंत्री व्हावे. मी तेव्हा त्यांना सांगितलं की मला मुख्यमंत्रीपद सोडायचे आहे पण मुख्यमंत्री पदच मला सोडत नाही आणि भविष्यातही हे पद मला सोडेल असे वाटत नाही, असं अशोक गेहलोत म्हणाले. राजस्थानमध्ये मुख्यमंत्रीपदासाठी तेच उमेदवार असतील हे त्यांनी या वक्तव्यातून जाहीर केले आहे. सोनिया गांधीजी काँग्रेसच्या अध्यक्ष झाल्या, तेव्हा त्यांनी पहिला निर्णय मला मुख्यमंत्री करण्याचा घेतला. मी मुख्यमंत्रीपदाचा उमेदवार नव्हतो, पण त्यांनी मला मुख्यमंत्री केले. मला मुख्यमंत्रीपद सोडायचं आहे, पण हे पद मला सोडत नाहीये आणि ते भविष्यात सोडेल असं मला वाटत नाही, असे अशोक गेहलोत म्हणाले. ते पुढे असेही म्हणाले की, माझ्यात काहीतरी खास असेल म्हणूनच मला पक्षाच्या वरिष्ठ नेत्यांनी तीनवेळा मुख्यमंत्री म्हणून निवडले.राजस्थानमध्ये काँग्रेसकडून उमेदवारांची यादी जाहीर करण्यात आली आहे. उमेदवारांच्या निवडीवरुन अशोक गेहलोत आणि सचिन पायलट यांच्यामध्ये बिनसल्याची चर्चा सुरु आहे. २५ नोव्हेंबरला मतदान होणार आहे, पण काँग्रेसकडून मुख्यमंत्री पदाचा उमेदवार अद्याप घोषित करण्यात आलेला नाही. त्यामुळे मुख्यमंत्रीपदावरुन काँग्रेसच्या दोन वरिष्ठ नेत्यांमध्ये पुन्हा वाद पाहायला मिळण्याची शक्यता व्यक्त होत आहे.

# अधिसूचित सेवांचा लाभ नियत कालावधीत देण्यासाठी अधिकारी, कर्मचाऱ्यांनी अधिक संवेदनशीलपणे काम करावे

लातूर, दि. १९ (जिमाका) : नागरिकांना पारदर्शक, गतिमान आणि कालबद्ध सेवा मिळावी, यासाठी राज्यात महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम लागू करण्यात आला आहे. या अधिनियमांतर्गत अधिसूचित विविध शासकीय सेवांचा लाभ नागरिकांना नियत कालावधीत देण्यासाठी प्रत्येक अधिकारी, कर्मचारी यांनी अधिक संवेदनशीलपणे काम करावे, अशा सूचना छत्रपती संभाजीनगर विभागाचे राज्यसेवा हक्क आयुक्त डॉ. किरण जाधव यांनी आज येथे दिल्या. महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियमांतर्गत अधिसूचित सेवांचा आढावा घेण्यासाठी जिल्हाधिकारी कार्यालयात आयोजित बैठकीत ते बोलत होते. जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी अनमोल सागर, अपर जिल्हाधिकारी सुनील यादव, निवासी उपजिल्हाधिकारी विजयकुमार ढगे, विलासराव देशमुख शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाचे अधिष्ठाता डॉ. समीर जोशी, जिल्हा परिषदेचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी डी. बी. गिरी, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. एच.व्ही. वडगावे यांच्यासह विविध शासकीय विभागांचे अधिकारी उपस्थित होते.महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियमांतर्गत अधिसूचित सेवांसाठी प्राप्त अर्जांचा निपटारा नियत कालावधीत होण्याचे प्रमाण वाढविणे आवश्यक आहे. अर्ज प्रलंबित राहू नयेत, यासाठी संबंधित विभाग प्रमुखांनी नियमितपणे आढावा घेवून पाठपुरावा करावा. तसेच प्रथम अपिलीय अधिकारी व द्वितीय अपिलीय अधिकारी यांनी आपल्या अधिनस्त पदनिर्देशित अधिकाऱ्यांच्या कामगिरीचा वार्षिक अहवाल तयार करून अधिनियमांतर्गत आवश्यक कार्यवाही करावी, अशा सूचना राज्यसेवा हक्क आयुक्त डॉ. जाधव यांनी यावेळी दिल्या.नागरिकांना जास्तीत जास्त सेवा त्यांच्या गावातच उपलब्ध होण्यासाठी प्रयत्न करावेत. यासाठी ग्रामपंचायत स्तरावरील आपले सरकार सेवा केंद्रांमधून त्यांना उपलब्ध होवू शकणाऱ्या सेवांची माहिती ग्रामपंचायत कार्यालयाच्या दर्शनी भागात लावावी, असे राज्यसेवा हक्क आयुक्त डॉ. जाधव यांनी सांगितले. तसेच काही सेवा ह्या विविध विभागांशी संबंधित असून त्याबाबतचे अर्ज निकाली काढताना संबंधित विभागांनी समन्वयाने काम करण्याच्या सूचना त्यांनी दिल्या.महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियमाविषयी मार्गदर्शन महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियमांतर्गत अधिसूचित सेवांचा नागरिकांना लाभ देताना करावयाची कार्यवाही, अधिनियमातील विविध कलमांतील तरतुदी, आपले सरकार सेवा केंद्र, अपिलावरील कार्यवाही, अपिलीय अधिकारी यांची कर्तव्ये आदी बाबींविषयी राज्यसेवा हक्क आयुक्त डॉ. किरण जाधव यांनी यांनी मार्गदर्शन केले. तसेच




सेवा महिना कालावधीत निकाली काढलेले अर्ज, तसेच या वर्षातील प्राप्त अर्ज व निकाली काढलेले अर्ज, अपिलांवरील कार्यवाही आदी बाबींचा त्यांनी आढावा घेतला. तत्पूर्वी जिल्हाधिकारी कार्यालयात नव्याने उभारण्यात आलेल्या हिरकणी कक्षाला भेट देवून तेथील सुविधांची माहिती घेतली.ग्रामीण भागातील नागरिकांना महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियमांतर्गत अधिसूचित सेवांचा लाभ अधिक गतीने मिळावा, यासाठी ग्रामस्तरीय अधिकाऱ्यांकरिता कार्यपद्धती निश्चित करण्यात येईल. तसेच त्यांच्याकडे प्राप्त अर्जांचा तातडीने निपटारा होण्यासाठी नियमितपणे आढावा घेण्यात येईल, असे जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी अनमोल सागर यांनी यावेळी सांगितले. प्रारंभी जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी अनमोल सागर यांनी ‘मराठवाडा मुक्तिगाथा : लातूर विशेष’ हा ग्रंथ भेट देवून राज्यसेवा हक्क आयुक्त डॉ. किरण जाधव यांचे स्वागत केले. यावेळी प्रातिनिधिक स्वरुपात नागरिकांना विविध प्रमाणपत्रांचे वितरण करण्यात आले.पोलीस अधीक्षक कार्यालय, राज्य उत्पादन शुल्क कार्यालयास भेट अधिसूचित सेवांबाबत कार्यवाहीचा आढावा घेण्यासाठी राज्यसेवा हक्क आयुक्त डॉ. किरण जाधव यांनी पोलीस अधीक्षक कार्यालयाला भेट दिली. यावेळी जिल्हा पोलीस अधीक्षक सोमय मुंडे यांनी अधिसूचित सेवांच्या अंमलबजावणीची माहिती दिली. डॉ. जाधव यांनी व्हिडीओ कॉन्फरन्सिंगद्वारे जिल्ह्यातील पोलीस अधिकाऱ्यांशी संवाद साधून महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियमांतर्गत अधिसूचित सेवांबाबत मार्गदर्शन केले. त्यानंतर त्यांनी राज्य उत्पादन शुल्क कार्यालयास भेट देवून अधिसूचित सेवांच्या अंमलबजावणीचा आढावा घेतला. यावेळी राज्य उत्पादन शुल्क विभागाचे अधीक्षक श्री. राऊत उपस्थित होते.

PRINTED BY MAHESH MOTIRAM RATHOD, OWNED, PUBLISHED & EDITED BY ASHOK NAMDEVRAO HANWATE, PRINTED AT MAYUR PRINTERS, PLOT No. B-28, MIDC, NEAR BUS STAND 03, LATUR, Tq. & DIST. LATUR - 413512 (M.S.) PULISHED AT : KHADAK HANUMAN, MILIND NAGAR, LATUR TQ. & DIST. LATUR - 413512 (M.S.) EDITOR : ASHOK NAMDEVRAO HANWATE